# प्रकरण चौथे

## डॉ. भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या

## दलित आत्मचरित्र ग्रंथाचे वाङ्मयीन विवेचन

## प्रकरण चौथे

## डॉ· भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या

## दलित आत्मचरित्र ग्रंथाचे वाड्.मयीन विवेचन

## "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथाचे वाड्.मयीन विवेचन

मराठी साहित्यामध्ये आजपर्यंत विविध वाड्.मय प्रवाह येवून मिसळले आहेत· दलित साहित्याच्या निमित्ताने जो नवा प्रवाह मराठी साहित्यात येवून मिसळला आहे· त्याचे स्वरूप जीवंत असून हा नवा प्रवाह विलक्षण जीवनदायी प्रवाह आहे· या वाड्.मय प्रवाहाच्या अभ्यासाने एक अपूर्व आनंद मिळतो· रसिकांनी या नव्या वाड्.मय प्रवाहाचे उत्स्फूर्त स्वागत केलेले आहे· "कोणत्याही भाषेतील जीवंत साहित्यात नित्य नवे प्रवाह उदयाला येत असतात· नवे प्रवाह साहित्य समृध्द करीत असतात· आणि साहित्यातील चैतन्य टिकवित असतात"[1] हा भालचंद्र फडके यांचा विचार या संदर्भात चिंतनीय आहे· हा दलित वाड्.मय प्रवाह आमच्या मराठी साहित्याला एक नवा जीवनरस देईल· असा आशावाद निर्माण झाला आहे· "दलित साहित्य" हे या मातीतले साहित्य आणि "मानवत्वाची प्रतिष्ठा" या महान मूल्यावर या साहित्याची श्रध्दा आहे· दलित साहित्यामागे प्रखर सामाजिक जाणीव आहे· या संदर्भात "केवळ सामाजिक वैषम्याचा बळी ठरलेल्या व्यक्तीच्या उत्कट भावना नव्हेत तर त्याच्या मुळाशी असलेल्या संबंधाचे प्रभावी चित्र वस्तूनिष्ठपणे उभे करणे हे सामाजिक जाणिवेतून निर्माण झालेल्या कलेचे कार्य असते·[2] असे प्रा·मुक्तीबोध दलित साहित्यासंबंधी म्हणतात·

दलित साहित्यात हजारो वर्षे माणुसकीचे हक्क नाकारलेल्या जाती जमातीच्या वेदना उत्कटपणे व्यक्त झाल्या आहेत· दलितांनी आजवर सोसलेल्या छळातून त्याला एक नवी दृष्टी प्राप्त झाली आहे· मी माणूस आहे आणि माणुसकीचे हक्क मी मिळविनच ही नवी दृष्टी देण्याचे क्रांतीकारी धाडस या साहित्याने प्राप्त करून दिले आहे·

आणि म्हणूनच "दलित साहित्यच भावी काळात होणा-या सम्यक क्रांतीचे नेतृत्व करीत असा आशावाद आत्मविश्वासाने व्यक्त होत आहे".[3] प्रल्हाद चेंदवणकर आता येणारे नवे युग दलित साहित्याचे आहे असे सांगताना त्या युगाचे स्वप्न उभे करताना म्हणतात, "मला पहाटेची स्वप्ने पडू लागली आहेत. या गावकुसा बाहेरचा काळोख मावळणारा हे आमच्या ओठातील प्रकाश गीताचे स्वर दाही दिशांना धुंद करणार आहेत.

असे सारे एकत्रित या
हातात हात घालून प्रकाशाचे गीत गा"[4]

नव्या जाणिवेतून लेखन करणारे कितीतरी दलित लेखक आज उदयास आलेले दिसतात. उदा. लक्ष्मण माने, उत्तम बंडू तुपे, लक्ष्मण गायकवाड, पार्थ पोळके, शंकरराव खरात, माधव कोंडविलकर, नामदेव व्हटकर, केशव मेश्राम, दया पवार, प्र. ई सोनकांबळे, दादासाहेब मोरे, न. सं. झोडगे, रूस्तुम अचलखांब, शरणकुमार लिंबाळे या दलित लेखकांच्या आत्मकथनाने मराठी वाड्मयाच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. अशा प्रकारची मौलिक भर डॉ. भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या आत्मचरित्र ग्रंथांनी घातलेली आहे. या लेखकांच्या आत्मचरित्रातून त्यांचे व्यक्तिमन झिरपले आहे व या व्यक्ती मनाच्या झिरपणेतून कर्नाटक व महाराष्ट्राचा चालता-बोलता इतिहासही प्रकट झाला आहे. अर्थात या आत्मचरित्रातून मराठी संस्कृतीचेही दर्शन घडले आहे. या आत्मकथनातून येणारे अनुशंगिक संदर्भ व त्यातून व्यक्त होणारे मन हाच दलित साहित्याचा प्रमुख गाभा आहे. ही आत्मकथने व्यक्ती मनाच्या दर्शनाबरोबर समाज मनाचे दर्शनही घडवितात. व्यक्ती बरोबर समाजच बोलत आहे असेही आपल्या लक्षात येते. या सर्व आत्मकथनातून समाजाची दुःखे, आशा-आकांक्षा, ताण-तणाव यांचे विराट रूप व्यक्त होते. प्रामुख्याने डॉ. भीमराव गस्ती यांच्या आत्मचरित्र ग्रंथातून त्यांच्या व्यक्ती मनाबरोबर भारतीय समाज व्यवस्थेच्या तळाशी खदखदणा-या जातीभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढीग्रस्तता, श्रेष्ठ कनिष्ठता, या अन्यायाने बधीर झालेल्या समाजाचे प्रत्ययकारी दर्शन घडते. डॉ. भीमराव गस्ती यांनी आपल्या जीवन कहाणीबरोबर आपल्या समाजाची, आपल्या गावच्या मानसिक, वैचारिक, सामाजिक जीवनाची कहाणीही

सांगितली आहे· आणि म्हणूनच आत्मकथन हे व्यक्ती मनाबरोबरच समूह मनाचा जीवंत व ज्वलंत अनुभव आविष्कार आहे· असा निष्कर्ष काढता येतो· "साध्या मानवी पातळीवर दलित जगू शकत नाही· अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा असतात· पण वर्णव्यवस्थेचा, जाती व्यवस्थेचा, आर्थिक विषमतेचा बळी झालेल्या दलित वर्गाला धड पुरेसे अन्न मिळत नाही· मनाजोगते वस्त्र मिळत नाही आणि निवारा कसाबसा मिळतो तो गाव कुसा बाहेर। त्याला देवाचे दर्शन दुर्लभ, पिण्यासाठी पाणी पाणवठयावरून नेता येत नाही· उलट त्याला मेलेली ढोरे ओढावी लागत· "सांगावा" करावा लागे· कारण हा वर्ग समाजचा दास"·[5] अशा वर्गातून येणा-या भीमराव गस्तींचे बेरडमधील अनुभव दाहक व वेदनामय असल्या शिवाय कसे रहातील· बेरड या डॉ·भीमराव गस्ती यांच्या आत्मचरित्र ग्रंथास महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सुमारे दहा पुरस्कार मिळाले आहेत· ही त्यांच्या लेखन कर्तृत्वाची पोहच पावतीच आहे· अशा या विविध पुरस्कारांनी विद्यामाल झालेल्या डॉ·भीमराव गस्ती यांचा जन्म बेळगाव जिल्हयातील यमनापूर या गावी झाला· डोंगराळ भागतील बेरड समाजात जीवनाचे कडूगोड अनुभव त्यांनी घेतले आहेत·

लेखक लहान असतानाच त्यांचे आजोबा मरण पावले· त्यावेळी लेखक शाळेला जात नव्हता· कारण त्याच्या मनामध्ये माराची भीती होती· मास्तर बेरड समाजातील मुलांना तर मरेपर्यंत मारत असतात· हे पाहून आजोबा आपल्या नातवाला शाळेत पाठवायला तयार नव्हता· हा सहा-सात वर्षाचा असणारा भीमराव उघडा नागडाच बेरड समाजाच्या आळीत फिरत असताना एक दिवस सकाळीच मास्तर बेरड आळीत आले त्यांनी भीमरावला खूप वेळ निरखून पाहिले आणि त्याच्या बाबांना म्हणाले, "बशानी, तुझं पोरगं मोठं झालं· आता शाळेस पाठवून दे। न्हायतर सरकार दंड करील बघा।" दंडाच नाव काढताच वडिलांनी मुलाला शाळेत पाठवून दिले आणि तेव्हापासून या लेखकाच्या श्रीगणेशाल सुरूवात झाली· दुस-या दिवसापासून लगम्या आणि परश्याबरोबर भीमराव शाळेला जाऊ लागला·

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

अक्का, फकी, सिदुन्या व श्रीमंत अशीही लेखकाची बहीण भावंडे होत. लेखकाची आई आवू व आजी त्यांच्यावर खूप प्रेम करत असे. दहावीनंतर त्याचा विवाह कमळी नावाच्या मामाच्या मुलीबरोबर झाला. त्यांचे अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरीच्या पाठीमागे न लागता आपल्या बेरड समजाच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. बेरड समाजाच्या सोडवणुकीसाठी त्यांनी इ.स. 1974 सालच्या सुरूवातीलाच चळवळ सुरू केली. बेरड समाजाला एकीकडे पोटाची लागलेली चिंता पाहून व दुस-या बाजूने पोलीस खात्याकडून होणारे अमानुष छळ होणारी उपेक्षा पाहून ते अस्वस्थ झाले. बेरड समाजाचे होणारे अनन्वीत छळ त्यांनी डोळ्यांनी पाहिले होते. व स्वतः अनुभवले होते. डॉ.भीमराव गस्ती यांनी जीवनात खूप काही भोगले, पाहिले आणि अनुभवले. अनेकांचे अन्याय अत्याचार व विरोध सहन करून बेरड समाजाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्याची त्यांना अंतःरीक प्रेरणा झाली. सामाजिक कार्य करताना आपल्या मनामध्ये स्वार्थी हेतू न ठेवता स्वतःला समाज कार्याला वाहून घेतले. सामाजिक कार्य करताना विरोधकांनी त्यांच्यावर अनेक वेळा प्राणघातक हल्ले केले.

समाजातील देवदासींची अनिष्ठ प्रथेमुळे हजारो निष्पाप मुली बळी पडतात. माणूसघाणे जीने जगण्याची त्यांच्यावर वेळ येते. देवदासींची वाईट प्रथा बंद व्हावी आणि देवदासींचे पुनर्वसन करावे, या हेतूने त्यांनी "उत्थान" नावाची संस्था स्थापन केली. ही त्यांची संस्था आज मोठया प्रमाणात कार्यरत आहे. बेळगाव, कोल्हापूर, गुलबर्गा, विजापूर या जिल्हयातील देवदासीचं प्रमाण जास्त आहे. तेव्हा देवदासींच्या प्रश्नासंबंधी अनेक कार्यक्रम आयोजित केले आहेत. या संस्थेने भगीरथ प्रयत्न करून देवदासींच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. त्यांनी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमास हजारो देवदासी सहभागी होतात. शासनाने देवदासींसाठी अनेक योजना आखल्या. परंतु त्या कागदावरच राहिल्या त्यामुळे हजारो देवदासींच्या पोटांचे प्रश्न कसे सुटणार त्यांच्या मुला-मुलींचे भवितव्य अंधःकारमयच आहे. देवदासींच्या पूनवर्सनासाठी व त्यांच्या मुलामुलींना नवजीव मिळवून देण्यासाठीच केवळ त्यांनी "उत्थान" संस्थेची योजना आखली. तीच यशस्वीरित्या राबवली आहे. देवदासींच्या मुलामुलींना शिक्षण मिळावे, देवदासींना आणि निराधार महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून जानेवारी

पासून शिवण व हस्तकला प्रशिक्षण सुरू केले आहे. प्रशिक्षण झाल्यावर त्यांना तेथेच कायम स्वरूपाचे रोजगार मिळावेत, डोंगराळ भागातील बेरड जमातीच्या मुला-मुलींसाठी जून 1993 पासून यमुनापूर येथे "रेसिडेन्शल स्कूल" सुरू केले आहे. देवदासींना स्वावलंबी बनविण्यासाठी कष्टाची भाकर केंद्र तसेच काही कुटीरोद्योगही सुरू केले आहेत.

डॉ.भीमराव गस्ती यांनी त्यांच्या "बेरड" या पूर्वार्ध आत्मचरित्रात इ.स.1674 ते ऑगस्ट 1982 पर्यंतच्या काळातील घटना चित्रित केल्या आहेत. त्यानंतर त्यांचा उत्तरार्ध आत्मचरित्र "आक्रोश" हा होय. डोंगराळ भागातील बेरड जातींना पोलीस खात्याकडून होणारे अमानुष छळ, प्रस्थापित वर्गाकडून होणारी उपेक्षा, त्यांच्याच जात बांधवाकडून होणारे हिंस्त्र छळ, शोषण, अत्याचार, अन्याय या सर्व गोष्टींविरूध्द त्यांना संघर्ष करावा लागला. याचे वर्णन त्यांनी "आक्रोश" या आत्मचरित्रामध्ये केले आहे.

1. <u>कथानक</u>

डॉ.भीमराव गस्ती यांनी "बेरड" या आपल्या आत्मचरित्रात आपल्या जीवनाचे वास्तवपट चित्रित केला आहे. बालपणापासून ते अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करेपर्यंत त्यांच्या जीवनामध्ये ज्या अडी-अडचणी त्यांनी भोगल्या, जे आनंदाचे क्षण त्यांनी अनुभवले व ज्या हृद्य शृंगारिक अनुभवाच्या स्मृती आपल्या हृदयाच्या गाभा-यात जपून ठेवल्या. शेकडो अडचणी आल्या तरी आपल्या प्रियतमेला ते विसरले नाहीत. याचे नाट्यमय व हृदयगम चित्रण हाच "बेरड" या त्यांच्या आत्मचरित्राचा आशय आहे.

बालपणी दारूच्या व्यवसायाची जवळून ओळख झालेल्या डॉ.भीमराव गस्तींना आपला समाज व आपले वडील दारूचाच व्यवसाय करून जगतात आणि या व्यवसायापायी बेरड समाजातील लोकांना पोलिसांचा मरेपर्यंत मार खावा लागतो आणि बरीच मंडळी पोलिसांच्या खरपूस मारामुळे मरण पावतात. असे का व्हावे ? याचे कोडे त्यांना उलगडत नसे. आपल्या वडिलांची आणि आपल्या समाजातील इतर लाकांची मानसिक स्थिती भेदरल्यासारखी का असावी ? पोलिसांची त्यांनी एवढी भिती का खावी ?

रात्रं-दिवस कष्ट करून पोटाची खळगी का भरता येवू नयेत, या विचाराने त्यांचे बालमन अस्वस्थ होत असे, हे सारे थांबले पाहिजे यासाठी काय करावे लागेल या विचारांचे त्यांचे आंतरिक मन बंड करून उठत असे पण परिस्थितीच्या भीषण रामरगाडयात ते चिरडले जाई आणि दडपून दबले जाई. भयाण दारिद्र्याला तोंड देणारे आपले आईवडील, बहीण-भाव आपले नातेवाईक, मामा-मामी व त्यांची मुलगी "कमळी आणि आपला बेरड समाज असे दारिद्र्याचे जिणे किती काळपर्यंत जगणार. जीव जात नही म्हणून हे जगत राहणारे आहेत काय ? दलित लेखकाबद्दल चंद्रकुमार नलगे व डॉ.पानतावणे यांनी काढलेले पुढील उद्गार या लेखकाबद्दलही काढणे योग्य ठरते. "आत्मकथनकार हे नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधी आहे. निरनिराळ्या अस्पृश्य जातीततून ते आले आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुभव कथनातील दाहकता वेगळेपणा आणि जीवनाचे पदर भिन्न भिन्न आहेत." [6]

प्रस्थापित वर्गाकडून होणारी पिळवणूक अशा समाजात असणा-या अठरा विश्व दारिद्र्यात डॉ.भीमराव लहानाचा मोठा झाला. ज्यावेळी त्यांनी शिक्षणाच्या श्रीगणेशाला सुरूवात केली तेव्हापासूनच वर्गात विद्यार्थी त्यांना शिवून घेत नव्हते. त्यांना चोर म्हणूनच विद्यार्थी ओळखत असत. कारण बेरड लोकच दरोडे घालत असतात, अशी सर्वत्र बेरड समाजाची ख्याती . एकूण-एक वर्गातील विद्यार्थ्यांच्या कानी-मनी रूजलेली होती. भीमराव दहावीच्या वर्गात शिकत असताना घरातील आई-वडिलांनी मामाला "तुझी मुलगी माझ्या मुलाला करतो" म्हणून दिलेल्या वचनाची भीमरावला आठवण होते. तारूण्याच्या उंबरठयावर येवू पाहणा-या भीमरावचे मन या आठवणीने मनोमन मोहरून जाते. कमळीला भेटण्याची उत्सुकता उचंबळून येते. मामाला दोन मुली होत्या. मुलगा नव्हता. तशी घरची परिस्थिती चांगली होती. पण मुलगा नसल्याने त्याला वाईट वाटत होते. तेव्हा याच कारणास्तव दारूच्या आहारी जावून आपल्या प्राणास मुकले. मामा वारल्यानंतर घराची शान मामाबरोबरच गेली होती. सगळच काही होत्याचं नव्हतं झाले होतं. मामीवर वैधव्याची कु-हाड कोसळली. परिस्थिती खालावली. हे समजल्यावर भीमराव दुःखी कष्टी झाले. एक वेळ मामाच्या घरी जाऊन कमळीला पहावे तिला लग्नाचे वचन द्यावे असे त्यांना वाटत असे. पण बापाच्या भीतीने ते मन मारून मनोमन कमळीला पाहात असे. भीमरावच्या वडिलांना शिक्षणाची

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

खूपच आवड होती· आपला मुलगा शाळेत जातो की नाही याची चौकशी करण्यासाठी अधूनमधून शाळेत जात· यावरूनच बशाणीचे शिक्षणाविषयी आपुलकी दिसून येते· असेच एकदा भीमराव घरातल्या लोकांच्या परस्पर मामीच्या घरी गेला होता· कारण मामीच्या घरची खालव लेली परिस्थिती पाहूनच मामीच्या मुलीशी म्हणजे कमळीशी लग्न करण्याचा त्याने निश्चय केला होता· तेव्हाच वडील बशाणीने वसतिगृहात जावून चौकशी केली· पण तो गावाला गेल्याचे समजल्यावर बशाणी घर परत आला· ज्यावेळी भीमराव मामाच्या गावाहून वसतिगृहात आला तेव्हा मुलांनी त्याला सांगितले की, "तुझा बाबा आला होता· तुझा बाबा लई रागावला होता आणि तुझ गावाकड पाठवून दे म्हणून सांगून गेला बघ" हे ऐकल्यावर त्यांची अवस्था बिकट झाली· आपल्या वडिलांना न घाबरता ते म्हणाले, "मी मामाच्या गावी गेलो होतो आणि माझं लगीन करायचं तर कमळीशीच करा" असे त्यांने वडिलांना सांगितले· इयत्ता दहावीच्या वर्गात शिकणारा भीमराव, पण त्यांच्या अंगी निर्णय घेण्याची क्षमता व धाडसी वृत्ती किती जबरदस्त होती याची यावरून कल्पना येते·

लेखकाने "बेरड" आत्मचरित्रामध्ये काही प्रसंग हृदयद्रावक वर्णन केले आहेत· त्यामुळे हा ग्रंथ वैशिष्टयपूर्ण ठरला आहे· ज्याने लहानपणी भीमरावचा जीव वाचविला तो म्हणजे लगमाण्णा होय· लगमाण्णा हा त्यांचा चुलत भाऊ होय· दारूच्या व्यवसायामुळे त्याला पोलिसांनी धरून नेले होते· पोलिसांनी त्याला एवढे मारले की, त्यातच तो मरण पावला, याचे भीमरावास अतिदु:ख झाले· लगमाण्णाची बायको घोरीजवळ जावून हातातील काकण फोडून घेते· तसेच बेरड समाजात अंध:श्रध्देचे प्रमाण जास्त आहे· यावरही लेखकाने आपल्या लेखनीने प्रकाश टाकला आहे· त्याचप्रमाणे निंगोमामाच्या घरच्या परिस्थितीचेही वर्णन त्यांनी केले आहे· सत्यव्वाची दैनी अवस्थाही चित्रित केली आहे· याच सत्यव्वाला जोगतीण म्हणून देवीला सोडले होते· लेखकाची लहान बहीण मल्लव्वा ही पायाने अधू होती· तिचे पाय बरे व्हावे म्हणून आई दर अमावस्येला खानापूरच्या मलप्रभा नदीला घेवून जायची· तसेच चिक्कोडीजवळील करोशी दर्ग्यालाही

घेवून जात असे. आई, बाबा व आजीची देवाधर्मावर श्रध्दा असल्याचे आपल्या लक्षात येते. कारखान्यामुळे बेरड लोकांचे जीवनच उद्ध्वस्त झाले होते. बेरड लोकांच्यावर होणा-या अन्यायाविरूध्द त्यांनी आवाज उठविला. महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श त्यांच्यासमोर होता. एवढेच नव्हे तर बेरड समाजात जातपंचायत कशाप्रकारची असते, जातपंचायतीचे नियमही कसे असतात या बारीकसारीक गोष्टींचे वर्णन यात केले आहे. बेरड समाजावर होणा-या चोरीचे आरोप व या आरोपाखाली बेरड लोकांना पोलिस यंत्रणा कशी छळते, याचेही वर्णन या आत्मचरित्रात केले आहे. बेरड समाजाला हाताशी धरून तसेच भीमरावांनी अनेक चळवळी उभ्या करून शासनाच्या कार्यालयावर मोर्चे काढले. काही प्रसंगी त्यांना बेरड समाजाच्या मानवी हक्कासाठी संघर्ष करावा लागला. त्याचबरोबर आक्रोशही करावा लागला. त्यावेळी कुठे सरकारचे बंदिस्त दरवाजे उघडले गेले. पण हे संपूर्ण कार्य घडवून आणण्यासाठी तब्बल 18 वर्षे अविश्रांतपणे त्यांना झगडावे लागले. त्यांनीही चळवळ कशी सुरू केली व का केली ? या संबंधीचे संपूर्ण चित्रण "बेरड"च्या पूर्वार्धात आले आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, "लहान मुलाचे पाय पाळण्यात दिसतात". उदा.लेखक इयत्ता 10 वीच्या वर्गात शिकत असताना कमळीबरोबरच लग्न करण्याचा घेतलेला निर्णय. तसेच बेरड समाजावर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्याचे ठरविले होते. लहानपणापासूनच त्यांच्या अंगी सामाजिक कार्याचे वा समाजाची सेवा करण्याचे उपजत गुण होते. त्यांच्या "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथामध्ये ऑगस्ट 1982 पर्यतच्या घडलेल्या घटनांचे यथार्थपणे चित्रण केलेले आहे. अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून भीमराव गस्तींनी आपल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या नेतृत्वाचा तपशील या आत्मचरित्रात जेव्हा आपण वाचतो तेव्हा आपण अंतर्मुख होतो आणि भीमराव गस्तीचे यशस्वी वैवाहिक जीवनाचे स्वप्न साकार झालेले पाहून आपणास एकप्रकारचा आनंद वाटतो. असे या आत्मचरित्राचे कथानक आपल्या हृदयाचा ठाव घेते व त्यातील कितीतरी प्रसंगातील नाट्य आपणास वेधून घेते.

इ.स. 1982 पासून त्यांची चळवळ ख-या अर्थाने वाढीला लागली. सर्वसामान्य लोकांच्यापर्यंत जाऊन पोहोचली. बेरड समाजाच्या प्रश्नासाठी त्यांनी अनेक

लढे उभे केले. त्यांच्या कार्याचा सर्वत्र गौरव झाला की, अनेक मान्यवर मंडळींनी त्यांना पत्रे लिहिली. "तुमच्या चळवळीत घडलेल्या घटना तुम्ही पुस्तकरूपाने प्रसिध्द करा" असा आग्रह धरला. या सर्व घटना लिहून काढण्यास त्यांच्याजवळ तसा वेळही नव्हता. पण अखेर त्यांनी वेळ काढून "बेरड व आक्रोश" हे आत्मचरित्र लिहिले.

मार्च 1987 मध्ये "बेरड" हा त्यांच्या आत्मचरित्राचा पूर्वार्ध प्रकाशित झाला. खरेतर त्यावेळी साहित्य क्षेत्रात दलित आत्मकथनाची लाट ओसरत आलेली होती. त्यांची "बेरड" ही साहित्यकृती साहित्यप्रेमी वाचक, रसिकांना मनापासून आवडली. महाराष्ट्रातील कानाकोप-यातील वाचकांनी त्यांचे अभिनंदन केले. सामान्य हमालापासून ते थोर विचारवंत आणि जेष्ठ साहित्यिक मंडळींनी "बेरड" या आत्मचरित्राचे मनापासून कौतुक केले. गोवा, महाराष्ट्र आणि सीमा भागातील बहुतेक सर्व वृत्तपत्रांनी व साप्ताहिकांनी "बेरड" हे एक दर्जेदार आत्मचरित्र म्हणून अभिप्राय देऊन कौतुक केले. महाराष्ट्र शासनानेही पुरस्कार दिला. ते त्यांच्या कार्यात सतत मग्नच राहिले. त्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र वाढत गेले. "बेरड" या आत्मचरित्रामुळे त्यांची चळवळ वाढीस लागली. त्यानंतर त्यांनी "बेरड"चा उत्तरार्ध म्हणून "आक्रोश" हे आत्मचरित्र लिहिले. त्यातील कथाभागही यथावकाश पुढे आलेलाच आहे.

2. <u>व्यक्तिचित्रणे</u>

कोणत्याही श्रेष्ठ व सरस साहित्यकृतीत आशय आणि आविष्कार एकात्म साहित्य कृतीला उच्च कलात्मक दर्जा प्राप्त करून देतात. या आत्मचरित्रातील व्यक्ती-चित्रणाचा परिपोश चांगला साधला आहे. व्यक्ती चित्रणातील जिवंतपणामुळे या आत्मचरित्राला अपूर्वत्व प्राप्त झालेले आहे. आशय सकस, सघन व भावोत्कट व्यक्तिचित्रण असल्याने त्याला आवश्यक तो शब्दांचा साज आपोआप लाभतो. कर्णाच्या कवच कुंडलाप्रमाणे अपरिहार्य प्रतिमा, रचना वगैरे सर्व काही जन्माबरोबरच गवसलेले असतात. डॉ.भीमराव गस्ती यांच्या "बेरड" या पूर्वार्ध आत्मचरित्रातील व्यक्तीचित्रणे वाचकांनाही भारावून टाकतात. "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथंतील पात्रे साध्या, सरळ , सोप्या भाषेत बोलणारी आहेत. यातील व्यक्तिचित्रणे कालक्रमाणे सूत्र धरून पुढे जात असतात. त्यांच्या हालचाली, पाहणे व बोलणे हेच इतके अर्थपूर्ण होते की, साध्या, सोप्या पध्दतीने ही व्यक्तीचित्रणे आपले मन वेधून घेतात.

"बेरड" या आत्मचरित्र ग्रंथाचे वैशिश्ट नजरेत भरते ते म्हणजे त्यातील व्यक्तिचित्रण कौशल्यामुळे· "आत्मकथन हे व्यक्तिमनाचे असले तरी त्यातून समाजमनाचेही दर्शन घडते"[7] याचे प्रत्यंतर या आत्मकथनाव्दारे येते· ठशठशीत व जिवंत व्यक्तिचित्रणे, सहज व सुबोध भाषाशैली, स्वाभाविक संवाद यामुळे या आत्मचरित्रास आगळेवेगळे वाड्मयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे·

निंगोमामाची थोरली मुलगी सत्यव्वा सौंदतीच्या यल्लामाला सोडली होती· त्यामुळे तिचे लग्न झाले नव्हते· दिसायला गोरीगोमटी होती· अंगाने भरलेली होती· निंगोमामाच्या घरी एक गडी होता· तसा तो नात्यातलाच होता· त्याच्याशी सत्यव्वाची उडकी करून दिली होती· तो सत्यव्वासंग बाजूच्या खोपटात राहत होता· सत्यव्वा नडगट्टयाच्या जंगलात जाऊन तेथील भट्टीतून दारू आणून घरात विकायची· तिच्याकडे दारू पिण्यास येणारी माणसे लगट करीत असत· सत्यव्वा जोगतीण असल्यामुळे तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते· तिचा नवरा तिच्यावर संशय घेतो व तिचा छळ करतो· शेवटी सत्यव्वास वेड लागते आणि एका विहिरीत पडून मरण पावते· डॉ·भीमराव गस्ती यांनी सत्यव्वाची व्यथा चित्रित केली आहे·

गस्ती इयत्ता सातवीच्या वर्गात शिकत असताना त्यांना वर्गशिक्षक म्हणून श्री·बा·रा·पाटील हे लाभले होते· त्यांच्याकडूनच गस्तींना गुरू या नात्याने खरे प्रेम मिळाले होते, दिलासा मिळाला होता· अडचण समजून घेणारे वर्गशिक्षक गस्तींना लाभले होते· गस्तींनी "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथामध्ये वर्णन केलेली चित्रणे आपल्याला त्यांच्या व्यथा व दारिद्र्य या आत्मचरित्रातील प्रमुख गौण पात्रेही वाचकांचे जवळचे जणू मित्र वाटतात व ती आपली दुःख आपणास जणू विश्वासात घेवून सांगत आहेत असे वाटते· अशाच पध्दतीने त्यांनी आपल्या मामीचीही व्यक्तिरेखा प्रत्ययकारी केली आहे· निंगोमामा मरण पावल्यानंतर जवळच्या नातलगांनी आऊला {मामीला} कंगाल करून टाकले होते· आपल्या अब्रूसाठी आपल्यावर होत असलेला अनयाय निमूटपणे सहन करीत होती· एक दोन वर्षातच तिच्या घरादाराचे, शेतीवाडीचे होते ते नव्हते झाले होते· कमळीचे लग्न उरकून घ्यावे अशी तिची इच्छा होती· कारण निंगोमामा

म्हणत होता की, "कमळीचं लगीन भिमुशीच करायचं" म्हणून ती या काळजीने पूर्णपणे थकून गेली होती· तिच्या नव-याने काढलेले कर्ज ती फेडून टाकते आणि कमळी तर लग्नाला आलेली असते· याचीही तिला काळजी वाटत असते· अशी लहान लहान व्यक्तिरेखादेखील विलक्षण प्रभावी झाल्या आहेत· गस्तींनी लगमाण्णाची व्यक्तिरेखा अशी रेखाटली आहे की, ती वाचताना वाचकाच्या मनात अनेक विचार येतात· त्याचा मृत्यू कशाने झाला याचे आपणासही तीव्र दुःख होते· लगमाण्णा हा त्यांचा चुलत भाऊ होता· त्यानेच गस्तींना वाचविले होते· दारूच्या गुन्हयात सापडल्यामुळे त्याला पकडून नेले होते· पोलिसांच्या लाथाबुक्क्यामुळे लगमाण्णा पोलीस ठाण्यात जनावरासारखा ओरडत होता· त्या पोलिसांच्या माराला घाबरून कोणी सोडवून आणण्याच्या भानगडीत पडले नाहीत· त्याला सतत मारत होते· त्याला सोडण्यात आले तेव्हा तो कायमचाच लुळा पांगळा झाला होता· घरी आणल्यानंतर आठच दिवसात मरण पावला· पोलिसांचा मार खाताना लगमाण्णाची झालेली अवस्था याचे वर्णन परिणामकारक शब्दात केले आहे, त्याच्या बायकोचा आक्रोश याचे वर्णन आपण वाचत असताना आपल्या हृदयाला चटका लावून जाते·

टॅनगी मामाचीही व्यक्तिरेखा चित्रीत केली आहे· त्यावरून त्याच्या स्वभावाविषयी आपणास कल्पना आल्यावाचून राहणार नाही· तो कोठेही जास्त वेळ थांबायचा नाही· उंचीने गिड्डा, त्याचा रंग कोळशासारखा काळा होता· अनपढ माणूस पण पंचागासारखे तंतोतंत माहिती सांगत असे· नुसते आभाळातील तारे पाहून शेतातील कामांविषयी सांगत असे· त्याचे एकही वाक्य खोटे ठरत नसे· त्याच्याच काका शिवाप्पा बेळगावकडच्या शेतक-यांची शेते राखण्याचे काम करीत· सुगीच्या वेळी शेतकरी एकेक सूप भरून भात देत· शिवाप्पा दिसायला एकदम चिल्लर माणूस· परिस्थितीने गरीब पोटासाठी रखवाली करणारा तेव्हा त्यालाही तंतोतंत भविष्य सांगता येत होते· शिवाप्पासारखाच शेजारच्या बेरडवाडयात बाळाप्पा नावाचा एक माणूस होता· जरी जातीने बेरड असला तरी त्यांच्यात आपणास प्रामाणिकपणाही दिसून येतो· तेव्हा काही बेरड समाजांना परिस्थितीमुळे वाम मार्गाला वळावे लागते· पण तरीही ते आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक असतात, हे आपणास शिवाप्प्याच्या व्यक्ति-चित्रणावरून दिसून येते·

अठरा विश्व दारिद्र्यात जीवन जगणारा क-या व त्याचे कुटुंब तसेच त्यांची होणारी दैन्य अवस्था याचे विदारक चित्रण क-याच्या व्यक्तिचित्रणातून केले आहे. क-याला लहान लहान चार मुले होती. त्याची बायको दुर्गव्वा आपल्या पतीच्या निधनाने आक्रोश करीत होती आणि आपल्या लहान मुलासह कसं तरी जीवन जगू लागली. घरात अठरा विश्व दारिद्र्य नांदत होते. घरी बसून काय पोट भरणार? शेतातून ज्या थोडया शेंगा आल्या होत्या त्या बाहेरगावी विकण्यासाठी गेला असता परत घरी येताना त्याला चोरांनी लुटला व त्याला मारून टाकला. शेंगा विकून आलेली रक्कमही गायब झाली होती. शेंगा विकून आलेल्या पैशातून पोराबाळांना नवीन कपडे करायचे आणि उरलेले पैसे घर खर्चाला उपयोगी पडतील असे त्या माऊलीचे स्वप्न होते. परंतु त्या स्वप्नाचा चुराडाच झाला. त्या पैशाबरोबरच तिचा मंगळसूत्राचा धनीही निघून गेला होता. या अवस्थेत जीवन जगणारी अभागी विधवा दुर्गव्वा डोंगरातील लाकूडफाटा गोळा करून जवळच्या हुदली गावात विकून कसेबसे जीवन जगत होती. कोसळलेल्या दुःखापेक्षा आता चार पोरासह कसं जगायचं, त्यांची पोट कसं भरायची, याचीच तिला काळजी लागली होती. मरण पावलेल्या नव-याची आठवण उराशी बाळगून जगणे हाच तिच्यापुढे मार्ग दिसत होता. अशाप्रकारे डॉ.भीमराव गस्ती यांनी दुर्गव्वाचे व्यक्तिवर्णन हृदयद्रावक शब्दात केले आहे.

तसेच "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथात गस्ती यांच्या घरातील वडिलांचे आईचे, आजीचे व कमळीचे व्यक्तिचित्रण अधिक ठळकपणे चित्रीत केली आहे. त्याचा ठसा वाचकाच्या मनावर कायमचा बिंबतो. सहवासातील लहान मोठया व्यक्तींची देखील नोंद आपल्या आत्मचरित्रात घेतली आहे. गस्ती यांच्या पाठीशी असणारे आदरणीय देशपांडे गुरूजी यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या व्यक्तिचित्रणात सरसच उतरले आहे. दिलदार मनाच्या, निस्वार्थी मनाच्या देशपांडे गुरूजींनी गस्तींच्या सामाजिक कार्यास मदत केली आहे. देशपांडे गुरूजींचा गस्तींच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे.

जी व्यक्तिचित्रणे आली आहेत ती जिवंत व ठोशीव स्वरूपाची आहेत. छोटी छोटी व्यक्तिचित्रणे वैशिष्टयपूर्ण ठरलेली आहेत. या गोण व्यक्तिरेखा असल्यातरी त्या सर्वातून बेरड समाजाच्या जीवनाचे दर्शन घडविणा-या आहेत. "बेरड"मधील

व्यक्तिचित्रणे कथनकाच्या आशयात एकजीव होवून गेलेली आहेत· वाचकाच्या मनात ती सदेव रेंगाळत राहतात·

### ३· वातावरणनिर्मिती

ज्यावेळी आपण आत्मचरित्रांचा वाड्मयीनदृष्टया अभ्यास करतो त्यावेळी वातावरण निर्मिती हा आत्मचरित्रातील घटक हा पूरक घटक म्हणूनही उल्लेख केला जातो· या घटकाचे "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथातील स्थान, कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, संवाद व प्रसंग इत्यादी घटकांच्या मानाने हे गौण असले तरी त्याचे महत्व कमी नाही· उदा·चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य असते, गायनामध्ये जे वातावरणनिर्मितीचे कार्य असते तेच कार्य आत्मचरित्र ग्रंथामध्ये या घटकांचे असते· वातावरण निर्मितीमुळे "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथातील प्रसंगाना उठाव मिळतो· एवढेच नव्हे तर विशिष्ट प्रसंगाचे खरे मर्म कळण्यास मदत होते· कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास वातावरण उपयुक्त ठरले आहे· म्हणून डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या "बेरड" या आत्मचरित्रात योग्य ते वातावरण निर्माण केल्याने त्यांच्या या ग्रंथास यश लाभले आहे· कथानकातील विविध प्रसंग, व्यक्ती आणि घटना यामध्ये कार्यकारण भावाची संगती या आत्मचरित्रात सहज प्रकट झाल्याने यातील व्यक्तिरदर्शनाचे खरे मर्म आपल्याला कळते·

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या "बेरड" या आत्मचरित्रात स्थल, काल, व्यकती यांचे भान ठेवून कथानकाचा तपशील दिला आहे· वातावरण निर्मिती करणे, ते भान न राहिल्यास बेरंग होण्यास वेळ लागत नाही· पण तसे गस्तींच्याकडून झालेले नाही· गस्ती यांनी आपल्या आत्मचरित्रात वातावरणाची निर्मिती करून वाचकास कथानकात गुंतवून ठेवले आहे· हे एक त्यांचे लेखनशैलीचे वैशिष्टयच म्हणावे लागेल· या वातावरण निर्मितीमुळे कथानकाचा प्रभाव वाचकांच्यावर पडला आहे· एवढेच नवहे तर गस्तींनी वाचकांच्या मनावर वातावरण निर्मितीचा दीर्घकाळ ठसा उमटवून ठेवला आहे· व कथानकाला गती प्राप्त झाली आहे· आमदार लक्ष्मण माने यांची "उपरा" व आनंद यादव यांची "झोंबी" या आत्मचरित्रांचा आपणास उल्लेख करता येईल·

भीमराव गस्ती आपले बरे-वाईट अनुभव चित्रण करताना लिहितात, "पायात खोलवर रूतलेला बाभळीचा काटा नुसता ठुसठुसत असतो तो काढावाच लागतो· तेव्हाच ठुसठुसनं बंद होतं· तसंच झालंय मनातल्या आठवणींचं, भोगलेल्या दुःखाचं··· नुसती जीवघेणी ठुसठुस···खोलवर सलणारी वेदनाच वेदना····मित्रांनो, मनात ठुसठुसणा-या पू धरलेल्या काटयासारख्या या वेदना! त्याचं तोंड मोकळं केलं पाहिजे····· कळ येईल, पू होत चाललेलं रक्त भळाभळा वाहिलही तरीही या वेदनाचं तोंड मोकळं केलच पाहिजे·" अशाप्रकारे त्यांनी आत्मचरित्राच्या सुरूवातीलाच वातावरण निर्मिती केली आहे· त्यामुळे वाचणा-यांची उत्सुकता वाढत जाते·

लेखक पाटी मिळाल्याच्या आनंदात रात्री उशीरा झोपला आहे· त्यामुळे तो सकाळी लवकर उठू शकला नाही याप्रसंगती त्यांनी सकाळच्या वातावरणाचे केलेले वर्णन यथार्थ वाटते· सकाळ झाली, कावळे घरावर बसून काव काव करीत होते· त्यांच्या तोंडावरील कांबळ त्यांनीच बाजूला सारली· त्यांची आई लवकर उठून पाणी आणत होती· त्यांचे बाबा परवाळीच उठून डोंगरात गेले होते· ते आपले डोळे चोळीत उठले आहेत· पाटीची आठवण झाली परंतु त्यांची पाटी नव्हती· त्यांच्या छातीत धस्स झाले· अशा वातावरण निर्मितीमुळे वाचक त्यात समरस होवून जातो·

लेखक देवळातील शाळेत आलेल्या अनुभवाचे वर्णन करताना लिहितो, चावडीच्या आत हनुमंताच देऊळ होतं· कुळवाडयातील मुलं आत जाऊन देवाला पाया पडत· आम्ही मात्र खालच्या कट्टयावर उभे राहून देवाला हात जोडत असू· बेरडांची मुले, गायी, बैल, म्हशीचं मांस खातात म्हणून आम्हाला वरच्या कट्टयावर पाय ठेवायला ही देत नसत· कुळवाडयातील काही माणसं देवळात येत· एका हातात तेलाची वाटी, दुस-या हातात उदबत्त्या घेऊन ते येत· आत जाताना ते आम्हाला तुडवीतच आत जात· आमच्यापैकी ब-याच जणांच्या पाटया ते तुडवून फोडत असत· ते जाता-येता आम्हाला दरडावीत असत - "सरका की रे बेरडांच्या पोरानु! मस्ती आलीया व्हय ? आणि मास्तरांना सांगत, "आव मास्तर, यासन लगवा की दोन-तीन रठ्ठं! बगा वाटबी सोडीत नेत!" अशा वातावरण निर्मितीमुळे आपणास बेरड समाजाची अवहेलना कशी केली जाते, हे स्पष्ट होते·

लेखकाने आपल्या आत्मचरित्रामध्ये होळी कामण्णाविषयी लिहिताना त्यांनी वातावरणाची निर्मिती चांगल्याप्रकारे केली आहे. उदा. चैत्र पौर्णिमा झाली. होळी कामण्णा उभा करून एक महिना होत आला होता. पौर्णिमेच्या रात्रीचं कामण्णाला सोडणार होते. दिवस मावळला तसा पूर्वेकडून चंद्र उगवला. पिठासारखं चांदण पडलं मांगांची हलगी घुमू लागली. या वातावरणनिर्मितीमुळे होळी कामण्णाविषयी आपल्याला कल्पना येते.

ज्यावेळी लेखक आपल्या मामीच्या गावाला जातो. घरात फक्त कमळीच दिसत असेते. तेव्हा मामीबद्दल कमळीस विचारतात. तेव्हा कमळा म्हणते, "आम्हाला घरात बसवून कोण ठेवणार ? आणि पोटाला तर कोण घालणार आहे ? आई शिवारात कामाला गेली आहे."

लेखक सत्यव्वाबद्दल कमळीला विचारतो, तेव्हा कमळी म्हणते, "जोगतीण म्हणून का सोडलं म्हणून बाबाकडे विचारायला गेली आहे. तुम्हाला कळवून तर काय उपयोग ? तुम्ही आक्काला परत आणणार आहे का ? आमचं नशीब फुटकं म्हणून कसेतरी दुःख गिळून गप्प बसलो. तिचं पोरगं अगोदरच वारलं होतं. नवराही तिच्याकडे लक्ष देत नव्हता. चार-पाच महिन्यात तिला वेड लागले. ज्याला त्याला "मिया जोगतीण नव्ह का रे! तू माझा नवरा! गावचे सगळे माझे नवरे!" अशी बडबडायची आणि एक दिवस बेपत्ता झाली. काही दिवसांनी शिवारातल्या एका विहिरीत तिचं प्रेत तरंगताना दिसले. आम्ही हृदयावर दगड ठेवून तिला मूठमाती दिली." लेखकाने आपल्या आत्मचरित्रामध्ये अशाप्रकारचे वातावरण निर्माण केल्यामुळे वाचकही त्या वातावरणात एकरूप होऊन जातो. त्यामुळेच हा आत्मचरित्र ग्रंथ उठावदार व दर्जेदार ठरला आहे.

लेखकाचे लग्न झाल्यावर ते आईदवीरसाठी मामीच्या गावाला गेले आहेत. म्हणजेच सासुरवाडीला गेले आहेत. त्यावेळी त्यांच्याकडून जो प्रसंग घडला आणि त्या प्रसंगाचे परिणाम इत्यादीचे वर्णन सुंदर केले आहे. भूमिहीन झालेल्या बेरड लोकांची अवस्था पाहण्यासाठी कारखान्याचे व्यवस्थापक गस्तींच्याबरोबर येत होते.

त्यावेळी गस्ती व्यवस्थापकांना म्हणतात, "गावात शाळा नाही, रस्ता नाही, दिवाबत्ती नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, संडासाला जाण्यासाठी गावाच्या बाहेर एक इंचही मोकळी जागा नाही. या लोकांच्या शेतजमिनीबरोबर बेरडांची स्मशानभूमीही कारखान्याने घेतली आहे. या लोकांनी जगावं कसं ? या सगळ्या समस्या कारखान्यामुळे निर्माण झालेल्या आहेत." या वातावरण निर्मितीमुळे बेरड लोकांचे दारिद्र्य आपल्या लक्षात येते.

क-याच्या कौटुंबिक जीवनाविषयी लिहितात, क-याला लहान सहान चार कच्ची बच्ची पोरं होती. त्याची बायको दुर्गव्वा दुःखानं आक्रोश करत आपल्या लहान पोरासह कसंबंस तरी जगू लागली होती. घरात अठरा विश्व दारिद्र्य. घरी बसून काय पोट भरणार ? शेतातून ज्या थोडया शेंगा उरल्या होत्या त्या बाहेरगावी विकण्यासाठी जाऊन घरचा कर्ता सवरता धनी प्राणास मुकला होता. शेंगा विकून मिळालेली रक्कमही त्याच्याबरोबरच गायब झालेली होती. त्या पैशाचं काय करायचं ? शेंगा विकून आलेल्या पैशातून पोराबाळांना नवीन कपडे करायचं आणि उरलेले पैसे घरखर्चाला उपयोगी पडतील, असं त्या माऊलीचं स्वप्न। परंतु देवानं तिच्या स्वप्नावर पाणी सोडलं होतं. पैसे तर गेलेच आणि त्या पैशाबरोबरच तिचा मंगळसूत्राचा धनीही निघून गेला होता. कधीही परत न येण्याच्या दिशेला। ती अभागी विधवा डोंगरातील लाकूडफाटा गोळा करून जवळच्या हुदली गावात विकून कसबंस तरी गुजराण करू लागली." अशा स्वरूपाचे वातावरण वर्णन करून दुर्गव्वाच्या घरातील अठरा विश्व दारिद्र्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

यल्ल्या वॉचमनच्या गोळीबाराला बळी पडला होता. त्याच्या शरीरात अनेक गोळ्या घुसल्या होत्या. यल्ल्या रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याच्या प्रेताजवळ त्याची आई, वहिनी, नातलग वगैरे बसून आक्रोश करत होते. यल्ल्याचा थोरला भाऊ हा अपंगच होता. लहानपणीच यल्ल्याचे वडील मरण पावलेले. यल्ल्याच्या आईचा रडून घसा बसला होता. पोलीस अधिकारी तिला शिव्या देत होते. तिच्या तोंडातून शब्दच फुटेनात. ती वेडयासारखी करू लागली. एका निष्पाप जीव बळी पडला होता. यल्ल्याचे लग्न झालेले नव्हते तेव्हा त्याचे रूईसंगे लग्न लावून नंतर त्या प्रेताला

अग्नी देण्यात आली· तेव्हा डॉ·भीमराव गस्ती यांनी अशाप्रकारचे वातावरण निर्माण करून वाचकांचे हृदय हेलावून टाकले आहे·

धनगट्टी गावात पोलिसांच्या गोळीबाराला बेरड समाजातील लोकं बळी पडली होती· या पोलिसांच्या अत्याचाराला घाबरून बेरड लोक डोंगरात पसार झाले होते· पोलिसांच्या छावणीने धनगट्टी गावात तळच ठोकला होता· दिसेल त्याला गोळी घालत होते· या गोळीबारात अनेक माणसे भयानक अवस्थेत मरण पावली होती· माणसांचे मृतदेह अस्ताव्यस्तपणे पडलेले होते· त्यांच्या पोटावर, छातीवर गोळ्या लागलेल्या होत्या· त्यांच्या अंगातील कपडे रक्ताने माखलेले आणि अनेक ठिकाणी फाटलेले दिसत होते· पावसात भिजल्यामुळे ते मृतदेह अधिक भयानक दिसत होते· प्रेतं अत्यंत भयानक व विद्रूप दिसत होती· गावात एक ही माणूस नव्हता· यथायोग्य वातावरण निर्मित साधून लेखकाने बेरड लोकांचे दुःख, दारिद्र्य, व्यथा, वेदना व समस्या इत्यादींची आपणास कल्पना आणून दिली आहे· वातावरण चित्रणेत लेखक यशस्वी झाले आहेत· कारण त्यांनी प्रत्यक्षात घेतलेले वा पाहिलेले अनुभव त्यांनी वर्णन केलेले आहेत· त्यामुळे "बेरड" हे आत्मचरित्र उल्लेखनीय ठरले आहे· तेव्हा वातावरणनिर्मिती हे त्यांच्या कलेचे एक वैशिष्ट्य ठरते· चित्रित केलेल्या वातावरणात वाचकही मग्न होवून जातो· तेव्हा इतर घटकाप्रमाणे वातावरण हा घटकदेखील त्यांच्या "बेरड" या आत्मचरित्रात महत्वपूर्ण ठरलेला आहे·

4· <u>संघर्ष</u>

बेरड समाज व प्रस्थापित यांच्यातील संघर्ष डॉ·भीमराव गस्ती यांनी लिहिलेले "बेरड" हे आत्मचरित्र पूर्णपणे संघर्षाने भरलेले आहे· बेरड समाज व प्रस्थापित वर्ग आणि पोलीस खाते यामधील संघर्षाचे चित्र येथे रेखाटले आहे· त्यामुळेच हे आत्मचरित्र जणू दुःख निवेदनच ठरावे असे आहे· यातील व्यथा, दारिद्र्य, बेकारी, दैन्य अवस्था व वेदना हे एका व्यक्तीचे नसून बेरड समाजातील लोकांच्या आहेत· "बेरड"मधील व्यक्तिवैशिश्टये जशी महत्वाची आहेत तसाच संघर्षही महत्वाचा आहे· एक आगळावेगळा ध्येयवादी, झुंजार व आक्रमक स्वभाव बेरड समाजातील लोकांच्याकडे

आहे· त्यामुळे "बेरड"मधील व्यक्तिचित्रणे ही अन्यायाविरूध्द आवाज उठविणारी आहेत· त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम गस्ती यांनी केले आहे· असा ध्येयवादी नेता बेरड समाजाला लाभला नसता तर बेरड समाजाचे दुःख, दारिद्र्य, व्यथा, वेदना व दैन्य अवस्था कोणीच जाणून घेतले नसते· तेव्हा बेरड समाजातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी गस्तींना संघर्ष करावा लागला आहे·

## बेरड समाज व कारखानदार यांच्यातील संघर्ष

बेरड समाजातील लोकांच्या जमिनी कारखान्यासाठी घेताना सांगितले होते की, ज्यांच्या जमिनी कारखाना बांधण्यासाठी दिल्या आहेत, त्यांना या कारखान्यात नोक-या देऊ· पण कारखाना सुरू झाला, ख-या अर्थाने ज्यांच्या जमिनी कारखान्यासाठी घेतल्या होत्या त्यांना कारखान्यात काम मिळाले नव्हते· ज्यांच्या जमिनी कारखान्याने घेतल्या होत्या त्या लोकांची अवस्था बेकार झाली होती· कारखान्याचे व्यवस्थापक त्यांना आज घेतो, उद्या घेतो अशी आश्वासने देत होता· बेरड लोकांची फसवणूक केली जात होती· कारखान्यात काम मिळण्यासाठी अनेक अर्ज केले पण त्याचा काही उपयोग झाला नाही· तेव्हा वैतागलेला बेरड समाजातील लोकांनी डॉ·भीमराव गस्तींच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या व्यवस्थापकाकडे मोर्चा नेला· गस्तींनी बेरड समाजातील लोकांची समस्या मांडली· त्यासाठी त्यांना संघर्षही करावा लागला आणि या संघर्षामुळेच बेरड समाजातील काही लोकांना कारखान्यात काम मिळाले· अशाप्रकारे डॉ·भीमराव गस्ती यांनी बेरड समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सतत संघर्ष केला आहे·

## भीमराव गस्ती व सामाजिक परिस्थिती यातील संघर्ष

गस्ती आपल्या समाजाचे हित जपणारे असून आपल्या समाजावर होणा-या अन्यायाविरूध्द संघर्ष करण्याची त्यांची जिद्द आपणास त्यांच्या "बेरड" या आत्मचरित्रातून दिसून येते· खरोखरच बेरड समाजाच्या व्यथा, दुःख, दारिद्र्य जाणून घेवून त्यावर नेमके कोणते उपाय केले पाहिजे याचाही त्यांना सखोल विचार आहे· त्यांची वैचारिक पातळी वरच्या दर्जाची असल्याची आपणास दिसून येते· आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून त्यांनी समाजाचे प्रश्न सोडविले आहेत· हे प्रश्न सोडविताना त्यांच्यावर प्राणघात

हल्लाही झाला आहे· तरीही ते आपल्या सामाजिक कार्यापासून अलिप्त राहिले नाहीत· त्यांनी संपूर्ण जीवनच सामाजिक कार्यासाठी वाहून घेतले होते·

## बेरड समाज व पोलिस यांच्यातील संघर्ष

गस्ती सामाजिक कार्य करीत असताना अनेक संघर्ष त्यांना करावे लागले आहेत· धनट्टी गावात घडलेला प्रकार अंगावर शहारे आणणारा होता· त्या गावात पोलीस बेरडांना बेछूट आणि निर्दयपणे गोळ्या घालत होते· पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन बेरड लोक मृत्युमुखी पडले होते· पोलिसांनी संपूर्ण गावाला वेढा टाकला होता· गावात चिटपाखरू देखील राहिले नव्हते· पोलिसांच्या गोळीबारापुढे आपला निभाव लागणार नाही म्हणून बेरड मंडळी डोंगरात पसार झाले होते· पोलिसांच्या गोळीने मरण पावलेली प्रेते अत्यंत भयानक दिसत होती· पोलिसांनी धनट्टी गावात तळच ठोकला होता· तेव्हा हे प्रकरण मिटविण्यासाठी गस्तींना संघर्ष करावा लागला·

## भीमराव गस्ती आणि गावचे पुढारी

गस्तींनी बेरड समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले· बेरड समाज जागृत होत होता· पण गस्तींचे कार्य पुढा-यांना पसंत नव्हते· गस्तींमुळे इतर पुढा-यांना कोणी विचारू शकत नव्हते· तेव्हा पुढारी मंडळी बेरड समाजातील लोकांना गस्तींच्या विरुध्द सांगत· तेव्हा हीच जातबांधव गस्तींवर खुनाचा डाव रचतात· पुढारी मंडळी पण गस्तींच्या सामाजिक कार्यात व्यत्यय आणत, असे जाणूनबुजून कृत्य करणा-या विरुध्द त्यांनी संघर्षही केला आहे·

पोलीस अत्याचारापासून बेरड लोकांना मुक्त करण्यासाठी त्यांना सतत संघर्षही करावा लागला· पोलिसांच्या अत्याचाराला बेरड लोक बळी पडत· बेरड ही एक गुन्हेगारी जात आहे· तेव्हा गुन्हेगार या शिक्क्यामुळे पोलीस खाते त्यांना छळत असत· अनेकांचे जीवन उद्ध्वस्त करून सोडले होते· तेव्हा हे सर्व नाहिसे करण्यासाठी बेरड लोकांची संघटना करून अन्यायाविरुध्द संघर्ष केला आहे·

अशाप्रकारे आपणास "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथामध्ये संघर्ष दिसून येतात. तेव्हा संघर्ष वर्णनामुळे बेरड हे आत्मचरित्र ग्रंथ वाङ्मयीनदृष्टया उत्कट झाला आहे.

5. <u>संवाद</u>

डॉ. भीमराव गस्ती यांनी आपल्या "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथात संवादाची निर्मिती केली आहे. ते अत्यंत साधे व बोलके आहेत. ख-या अर्थाने जर विचार केला तर "बेरड"मधील संवादाला कमालाची वास्तवपूर्णता प्राप्त झालेली आहे. या संवादामुळेच त्यांचे आत्मचरित्र हा ग्रंथ आपणास महत्वपूर्ण वाटतो. या आत्मचरित्रातील संवाद बेरड लोकांच्या बोलीभाषेत असल्याने बेरड लोकांच्या परिस्थितीचे यथातथ्य चित्रण घडविणारे आहेत. डोंगराळ भागात राहणारे बेरड लोक व त्यांचा व्यवसाय हे आपणास त्यांच्यातील संवादावरून समजते. त्यामुळेच "बेरड" या आत्मचरित्रातील व्यक्तिरेखा आकर्षक व बोलक्या झाल्या आहेत.

भूमिहीन झालेल्या बेरड लोकांचे संवाद, देवीला सोडलेल्या जोगतीणींचे संवाद, डोंगराळ भागात दारू काढून त्यावर आपला उदरनिर्वाह चालविणा-या लोकांचे संवाद, असह्य जीवन सहन करणा-या लोकांचे संवाद इत्यादींचे चित्रणत्यांनी त्यांच्या बोलीभाषेत केले आहे. पण त्याचबरोबर पुढारीपणाच्या रूबाबात असणा-यांचे संवाद याचेही त्यांनी मार्मिक व परिणामकारक शब्दात वर्णन केलेले आहे. बेरड लोकांची जी बोलीभाषा होती तीच व्यक्तिरेखानुसार संवाद "बेरड" या आत्मचरित्रात वापरल्याने त्यांच्या व्यथा, दारिद्र्य, वेदना, दुःख व समस्या वाचकांनाही समजू शकल्या. हेच वाङ्मयीन कौशल्य गस्तींच्या अंगी असल्याचे आपणास दिसून येते. त्यांचे "बेरड" हे आत्मचरित्र अठरा विश्व दारिद्र्यात जीवन जगणा-या बेरड लोकांच्या व्यथा व समस्या सोडविण्यासाठी संवाद उपयोगी ठरले आहेत. म्हणूनच त्यांचे "बेरड" हे आत्मचरित्र वैशिष्टयपूर्ण ठरले आहे आणि मराठी वाङ्मयाच्या दालनात महत्वपूर्ण भर त्यांनी टाकली आहे.

"बेरड" या आत्मचरित्रग्रंथाचा वाङ्मयीनदृष्टया अभ्यास करताना त्यामधील खालील संवाद आपल्या लक्षात येतील. भीमरावला शाळेला पाठविण्याबद्दल मास्तर त्यांच्या वडिलांना म्हणतो,

"बशानी, तुझ पोरगं मोठं झालं, आता शाळेत पाठवून दे।"

"आजून ल्हान हाय गा।"

"कसलं लहान ? सात वर्षाचं झालं नव्ह ? मग द्या पाठवून। न्हायतर सरकार दंड करील बघा।"

गस्तींचे थोरले चुलते पोलिसांच्या खूप मारामुळे आजारी पडले आणि त्या आजारपणातच तो मरण पावला· त्यावेळी त्याची म्हणजे गस्तीं यांची आजी म्हणते, "माज्या पोरास्नी म्हातारी कोतारी न होऊ देता भरल्या सौंसारातून तू का नेलंस रे देवा ? त्येच्या परास मास का बोलावून घेटले न्हाईस ? आता माझं काय राहिलें हाय ? कशाला जगू रं देवा। सोन्यासारखी पोरं गेली भरलं सौसार सोडून।"
यावरुन आपणास तिच्या मुलाविषयी असणारी ममता दिसून येते·

पाहुण्यांचे जुने संबंध जोडण्यासाठी गस्तींच्या आईचा मावसभाऊ निंगोमामा आपली मुलगी कमळी भीमरावला करण्याबाबत तो आपल्या बहिणीस म्हण्तो,
"आवू तुज्या पोराला माजी कमळी देणारं हं।"

"अण्णा, तुला सोडून मिया का हाय ? एवढ वरसं आमी लांब व्हतो, आता तरी जवळ येऊस पाजे अण्णा।"

"आवू, नाती जुळवूस पाजे नव्हं। मावशी मेल्यापास्न तुमी सारी दूर झाला व्हता, आता आमच्या कमळीमुळं तरी जवळ येवू या। पावण्याला सांग असं।"

डोंगराळ भागात जाऊन भट्टीवरून दारू आणून विकून त्यावर आपला संसार खर्च चालविणारी सत्यव्वाचे म्हणजे जोगतीणीचे संवाद यावरून तिचे आपणास कळते दारू प्यायला येणा-यास म्हणते,
"पैसे हायती न्हवं ? उधरी नकं बा।"

"किती पायजेत पैसं।"

तो तिच्याशी गैरवर्तणुक करतो त्यावेळी ती म्हणते -
"गुमान इथनं जा, नाय तर बरं होणार नाय।"

"हात धरला म्हणूनशान काय झालं ? तू जोगतीण नव्ह गावची ? पैसं मोजलं की झालं, लै दिमाख दावू नगंस।"

"जोगतीण झाली म्हणून मी का तुझी रांड होवू व्हय ?"

वरील संवादावरून आपल्या लक्षात येते की, जोगतीणीचे जीवन कशाप्रकारचे असते· त्यांना समाजात वावरत असताना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते· याचेही आपणास आकलन होते·

जातपंचाचे संवाद यांचेही त्यांनी वर्णन केले आहे· तेव्हा जमलेल्या जातपंचापैकी एकजण गस्तीला म्हणाला, "हयो कोन गा ? कंच्या गावासन आलाय हा पंच ?"
"हा पंचापैकी नव्हं, त्यो भागीचा नवरा हाय·"
"हयाला कशाला घेवून आलास ? या जातपंचायतीच्या बैठकीच त्येचं काय काम?"
"त्यांचं बी या बैठकीत महत्वाचं काम हाय म्हनून त्यो आलाय।"
"असं बायकूला नांदवत्यात व्हय रं ? तिच्याशी चांगला सौसांर केला असतास तर तुजी बायकू पळून गेली नसती· तिला मारतबिरत व्हतास काय रं ? तुज्यातच काय तरी दोष हाय· आन चुकबी हाय असं आमासनं दिसलाय। तिचा बायकूस नीट वागवूस न्हाय म्हणून दंड बांधले पाहिजे।"

यावरून आपणास जातीपंचायतीचे काय नियम असतात ? त्यांची बोलण्याची पध्दत कशी असते ? हे आपणास त्यांच्या बोली भाषेतील संवादावरून कळते·

धनट्टी गावात घडलेला प्रकार हा अत्यंत भयानक असा होता· पोलिसांनी गोळीबार चालू केला होता· धनट्टी गावातील बेरड लोक या भितीपोटी डोंगरात पसार झाली· काही लोकं मृत्युमुखी पडली, ही वार्ता सांगण्यासाठी धनट्टीचे लोक गस्तींच्याकडे आले आहेत, ते म्हणतात, -
"पावण्या, नम्म उरूगा बाळं क्याट आग्येतप्पा"
म्हणजे (पावणं आमच्या गावात फार वाईट घडलं आहे·) त्यावर लेखक त्यांना म्हणतो, "येन आग्येती अदनरे हेळीरीला, नीवा हेळीद मेले नन्नगा तिळीदुला ?" म्हणजे (काय झालं आहे ते तरी सांगा, तुम्ही सांगितलं तरच मला समजणार ?)

अशा स्वरूपाचे संवाद हे बेरड लोकांच्या बोलीभाषेत वर्णन केल्यामुळे त्यांच्या परिस्थितीचे वास्तव चित्र स्पष्ट होते· "कलेक्टर साहेबांचा हुकूम हाय म्हण की, गावातल्या सगळ्या झोपडयांना आग लावून सोडण्याची। आमच्यावर अन्याय होवून बी आमचं ऐकून घेवूस कोन तयार नाय· तवा तुम्हीच पावणं काहीतरी खटपट करा।" यावर गस्ती म्हणतात, "इतक्या रात्री तुम्ही जाणार कसं ? उद्या सकळी

जावा।"

"तिकडं सगळं गाव पेटलेलं हाय। आमचं सौंसार उद्ध्वस्त होवूल्यात· इथ बसून का करू ? त्यापेक्षा डुंगरात आमच्या लोकांचं, बायका-पोरांचं काय काय हाल झालं हाय ते बघूस पायजे।" या संवादावरून बेरड लोकांचे दुःख व दारिद्र्य दिसून येते·

गस्तींचे जातबांधव हुलीवू राहून त्यांना मारण्यासाठी आले होते· पण लेखक आपल्या कामानिमित्त बेळगावला गेला होता· तेव्हा बेरड लोक गस्तींच्या बापाला म्हणतात, -

"कुठं हाय तुझा तो पोरगा ? त्यास बाहेर काढ गुमान। आणि मुकाट्यानं आमच्या हवाली कर।"

"काय केलं हाय माझ्या पोरग्यानं ? डोंगरातल तुम्ही बेरड, खाल्या घरचं वासे मोजणारे। माझ्या पोरग्यान काय बिघडवलं हाय तुमचं ? त्याचं खून का करत्याशी ? मला बी पाच पोर हायीत एकटा गेला म्हणून काय झालं ? याद राखा। मीयाबी बेरडच हाय। पर तुमच्यासारखं नाय, जातिवंत बेरड हाय। याचा बदला घेतल्याशिवाय -हाणार नाय।

तेव्हा ती लोकं कमळीला म्हणतात -

"कुठं हाय तुझा त्यो नवरा ? कुठ दडवून ठेवली हायीस बोसडी ?"

कमळीही संतापनं थरथरत त्यांना म्हणते -

"घरात लपून बसण्यास ते काही षंढ नाहीत· आपल्या काही कामासाठी बेळगावला गेले आहेत सकाळी। बेळगावला जावा आणि सापडतील तेथे त्यांचा खून करून तुमचे हात कलंकित करून घेवा जावा। ते मेले तरी मी माझं कपाळावरचं कुंकू पुसणार न्हायी।"

अशा संवादावरून बेरड लोकांची प्रवृत्ती कशी आहे, हे गस्ती यांनी आपल्या "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथात संवाद चित्रण करून दाखविले आहे·

बेरडवाडयातील ज्यांना ज्यांना गस्तीने कारखान्यात कामाला लावले होते, ते सर्व कामगार आपल्या बायका-मुलांना सुखात ठेवत होते· सगळे खाऊन-पिऊन सुखी होते, ते पाहून कमळी आपल्या पतीला वैतागून म्हणते, "तुम्ही किती म्हणून दुस-यासाठी करणार ? आणि इथं तर आमच्या अंगावर धड कपडा लवकर मिळत नाही तुम्हीही कंगाल बनत आहात आणि आम्हा सगळ्यांनाही त्याच अवस्थेकडे नेत आहात·

त्या डोंगरातील लोकांच्या न्यायासाठी झगडणारे तुम्ही - अगोदर आम्हाला काही तरी न्याय द्या।"

"कमला माझा मार्ग वेगळा आहे· मी तुम्हा सगळ्यांना कष्टाशिवाय काही देऊ शकणार नाही· माझ्याकडून सुखाची अपेक्षा करू नका· कष्टातच माणूस माणुसकीला जपतो· त्यांच्याकडे सुख-संपत्ती आली की, तो माणुसकीला विसरतो· माणसाला मोठेपणाची धुंदी एकदा चढली की, तो दुस-यांना तुडवतो· याहून आपल्याच माणसांनाच जास्त तुडवतो· कमला मला हेच नको आहे· अग, आपण फार गरीब झालो आहे, असे तू म्हणतेस। माझ्याबरोबर एकदा डोंगरात चल· तेथे आमच्याहूनही कितीतरी पटीनं विपन्नावस्थेत आपली माणसं जगत असलेली दिसतील तुला ? त्यांचे शरीर म्हणजे हाडांचा सापळाचं हे सगळं कोणामुळे ? त्या पोलिसांच्या अत्याचारामुळे।"

अशाप्रकारे घरगुती कुटुंबाचे संवाद आपणाला बेरड समाजाच्या कुटुंबात नेऊन सोडतात व त्या कुटुंबातील एक असे वाचकासही वाटावयास लावतात·

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या बेरड या आत्मचरित्रात जे संवाद चित्रित केलेले आहेत ते संवाद वाड्मयीनदृष्टया महत्वाचे आहेत· या संवादामुळे प्रत्येक प्रसंग व प्रत्येक व्यक्ती आपल्या मनावर अशी ठसविली गेली आहे की त्यांनी वाचकाच्या मनात स्थान पटकाविलेले आहे·

### 6· प्रसंग

"बेरड" हा आत्मचरित्र ग्रंथ अनेक प्रसंग चित्रांची साठवणच आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही· "बेरड"मधील प्रसंग वर्णने कधी लोभस तर कधी भेदक झाली आहेत· त्यांनी जे जे अनुभवले तेच अनुभव "बेरड"मध्ये चित्रित केले आहेत· त्याचबरोबर बेरड समाजातील जी जी माणसे आपली व्यथा सांगत असणारी भेटली त्याचेही हृदयद्रावक वर्णन त्यांनी केले आहे· यातील प्रसंग वर्णनामुळे वाचकसुध्दा त्या प्रसंगाशी एकरूप होवून जातो· बेरड या आत्मचरित्र ग्रंथातील प्रसंगावरून बेरड समाजाची दैन्य अवस्था, दुःख, व्यथा व त्यांचे दारिद्र्य इत्यादीचे दर्शन आपणास होते· याच बेरड समाजात सामाजिक जागृती करत असताना लेखकावर देखील भयानक प्रसंग आले आहेत याचेही त्यांनी सत्य वर्णन केलेले आहे·

लेखक पहिल्याच्या वर्गात शिकत असताना त्यांच्यावर एक प्रसंग आला तो म्हणजे आपल्या मित्रांच्या बरोबर आंघोळ करण्यासाठी ओढयाच्या एका जागी डोह होता त्यात उडया घेत. त्याचबरोबर ओढयाच्या जवळ असणा-या चिंचेच्या झाडावर चढून सर्वजण चिंचा खात. हे झाड एका शेतक-याचे होते. या शेतक-याने या सर्वांची खोड मोडण्यासाठी म्हणून डोहात बाभळीच्या फांद्या टाकल्या होत्या. ही सर्व मित्र मंडळी रविवारी नेहमीप्रमाणे त्या डोहात उडया टाकू लागले त्यामुळे बाभळीचे तीक्ष्ण काटे सर्वांच्या पायात मोडले. प्रत्येकाच्या अंगात, खांद्यात, पायात काटे रुतले. त्यामुळे त्यांना पोहताही येत नव्हते व पाण्याबाहेरही येता येत नव्हते. या घटनेमुळे बेरड समाजातील लोकं भीमरावाच्या नावानेच ओरडू लागले. तेव्हा हा प्रसंग जेवढा नाट्यपूर्ण तेवढाच कारूण्यपूर्ण आहे.

बेरड समाजातील लोकांचा अंधःश्रध्देवर खूप विश्वास. जणू देवच आपलं भलं करीत असतो अशी सर्वांची धारणा झालेली असते. या अंधश्रध्देपोटी घडलेला प्रसंग अगदी मजेदार आहे. लेखकाच्या आत्याच्या मुलाचे लग्न असते तेव्हा विवाह सोहळ्याच्या दिवशी वेगवेगळ्या देवाला बकरी कापावयाची असतात. "ईर" काढण्यासाठी दोन बकरी, त्याशिवाय नेहमीच्या देवाना पाच बकरी अशी एकूण सात बकरी कापली जातात. तेंव्हा मटणाच्या जेवणावर सर्व बेरड समाज ताव मारतात. थोडा वेळ गेल्यानंतर काही लोकांना उलटया-जुलाब सुरू झाले. कोणी भडाभड ओकू लागले, कुणी मेलो म्हणून ओरडू लागले, सर्वच माणसांची धावपळ सुरू झाली. काहीजण म्हणत, "ईर देव लई कडक आहे, त्याची पूजा करण्यात काय तरी घोळ झालाय. म्हणूनशान सगळ्यांच्यावर देव कोपलाय।" बघता बघता सगळ्या मांडवावर सुन्न अवकळा पसरली. लेखकाची आत्या तर धैर्य खचून अंथरूणातच आडवी झाली होती. काय चुकलं रं माझ्या देवा" असं ती देवाला म्हणत होती. हा कोप नाहिसा करण्यासाठी अनेक देवांना नवस करू लागली. सर्वजण लसमाक आत्यास दोष देत होते. अशाप्रकारे लेखकाने आपल्या आक्काच्या लग्नातील प्रसंग वर्णिला आहे.

या प्रसंग वर्णनामुळे एका गंभीर विषयाला विनोदाची झालर जोडून लेखकाने हा प्रसंग अधिक रोचक केला आहे. विनोद हे टीकेचे एक प्रभावी अस्त्र आहे. सामाजिक

व व्यक्तिगत दोष दाखविण्यासाठी या वर्णिलेल्या प्रसंगाने बेरड समाजाच्या अंधःश्रध्देवर परखड प्रकाश टाकला आहे· डॉ·भीमराव गस्ती प्रसंगाची सुंदर मालिकाच आपल्यापुढे उभी केली आहे· त्यामुळे एक एक प्रसंग त्या व्यक्तिसह आपल्या डोळ्यापुढे जसाच्या तसा उभा राहतो· चलतचित्रपट शैलीप्रमाणे एक एक दृश्य जणू आपण डोळ्याने पाहतो आहोत असा भास निर्माण होतो·

लेखक इयत्ता पाचवीचे शिक्षण घेण्यासाठी बेळगावला गेले होते· ते सर्व विद्यार्थ्यांच्यात समरस न होता ते अभ्यासात मग्न असत· हुशार मुलांची बरोबरी करण्याचा प्रयत्न करीत होते· त्यांची प्रगती पाहून काही विद्यार्थी जळू लागले होते· तेव्हा जाणूनबुजून त्यांच्या पिशवीत कोणीतरी कंपास पेटी चोरून ठेवली· त्याचा आरोप गस्तींवर करण्यात आला· सर्व विद्यार्थी म्हणत गस्तीनेच कंपास पेटी चोरली आहे· पण आपल्या पिशवीत कंपास आहे हे त्याला माहित नव्हते· सर्वांच्या पिशव्या तपासण्यात आल्या त्यावेळी गस्तींच्या पिशवीत कंपासपेटी सापडली· तेव्हा गस्तींच चोर ठरले गेले· मास्तरने छडीने मारायला सुरूवात केली· पाठीवर, पायावर, हातावर सपासप छडया बसत होत्या· गस्तींना तो गुरासारखा बडवत होता· या मारामुळे गस्ती "आई ग" म्हणून जमिनीवर कोसळले पण कोसळलेल्या गस्तीला कोणी उठवायला आले नाही· त्यांचे अंग वेदनेने ठणकत होते· त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते· चोरी करणा-या जातीत जन्मला म्हणून त्यानेच चोरी केली असावी असे सर्वांना वाटले· अशा स्वरूपाचा प्रसंग वाचताना आपल्यालादेखील वाईट वाटते· आपले मन खिन्न होते·

जी माणसं आपल्या जवळची असतात त्याच माणसापासून कसा अन्याय होतो याचे विदारक चित्रण गस्तींनी केले आहे· हा प्रसंग वाचकाला देखील प्रस्थापित समाज-वरूवस्थेबद्दल चीड आणतो· तसा प्रसंगच त्यांच्यावर आला आहे· ते प्रसंगाचे वर्णन करतात· वर्गात शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना शिकवित होते· इतक्यात देसाई गुरूजी वर्गात आले आणि गस्तीला म्हणाले, "काय रे गस्त्या, काय करून आलास ते ब-या बोलानं सांग, हरामखोरा|" या बोलण्याने गस्ती गोंधळून गेले· तेव्हा गसतींना काही सुचेना शेवटी देसाई गुरूजींने त्यांना विहिरीजवळ घेवून गेले· बरोबर वर्गातील मुले

व शिक्षकही होते· त्या विहिरीजवळ कोणीतरी बरीच घाण केलेली होती· ती घाण गस्तींना काढायला लावली त्यांनी दोन्ही हातांनी उचलली· खूपच दुर्गंधी येत होती· त्या कृतीची त्यांना अक्षरशः शिसारी आली· त्यांनी चार-पाच ठिकाणी असणारी घाण गोळा करून माळावर नेऊन टाकली· त्यांचे हात घाणीमुळे वास मारत होते· तेव्हा ही भानगड जाणूनबुजून गोंडवाडच्या दोन खोडकर मुलांनी केली होती· हा प्रसंग वाचतानाही किळस यावी अशीच आहे· बेरड समाजातील विद्यार्थ्यांवर कसा अन्याय केला जात होता याचे हे भेदक चित्र निश्चितपणे प्रत्ययकारी आहे यात शंका नाही·

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्याला आलेल्या प्रसंगाच्या अनुभवांची उकल बेरड या आत्मचरित्र ग्रंथात केली आहे· कांगे हा गस्तींचा मित्र होता· तो गस्तींना गणित वगैरे सोडवून देत· त्यामुळे गस्ती त्यांच्या खोलीत सतत जात· एकदा गस्तींना शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेली होती· त्यातील वीस रुपये रक्कम बाबांच्याकडून मागून घेतली होती कारण त्यांना त्यांच्या पसंतीच्या कापडाची चड्डी शिवावयाची होती· तेव्ही ही संधी साधून कांगे याने आपले पैसे चोरल्याचा आरोप गस्तींच्यावर घेतला· ती तक्रार वसतिगृहाचे व्यवस्थापक यांना सांगितली· तेव्हा सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे खिसे तपासले तेव्हा वीस रुपये सापडले· व्यवस्थापकांना वाटले कांगेचे पैसे गस्तीनेच चोरले म्हणून त्यांना मारायला सुरुवात केली· गस्तींना भयंकर मार दिला· केवळ बेरड समाजात जन्माला आल्याने होणारा गुन्हा गस्तींच्यावर लादला पण खरी परिस्थिती काय आहे, हे पडताळून पाहण्याच्या भानगडीत कोणी पडत नव्हते, असे अनेक प्रसंग चित्रित केले आहेत·

आपले जात-बांधव आपल्यावर कसे उलटतात याचेही चित्रण त्यांनी केले आहे· पुढा-यांनी या जमातींची डोकी भडकावली, तेव्हा गस्तींना ठार मारण्याची धमकी जात बांधवांनी दिली· कारण त्यांनी बेरड समाजाविषयी लेखन करून ते वर्तमान-पत्रातून प्रसिध्द केले होते· तेव्हा त्या लोकांना आपली अब्रू घालविली असे वाटले म्हणून एक संतप्त बेरड कु-हाड घेऊन पुढे आला त्यांच्या मानेवर कु-हाड धरली· काही लोकांनी पुढे येऊन ती कु-हाड पटकन धरली· असा जीवघेणा प्रसंग त्यांच्यावर उद्‌भवला होता·

बेरड समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने कार्यात मग्न झालेल्या गस्ती यांनी आपल्या पडायला झालेल्या घराकडे बिलकुल लक्ष दिलेले नव्हते. आणि पडक्या घरात कमळी, निलू, मालती व सुरेश राहात होती. ऑगस्ट महिन्यात मोठा पाऊस पडल्याने पडायला झालेले घर कोसळायला लागले. वरून पाऊस धो, धो कोसळत होता. त्याचबरोबर भिंतीच्या विटाही कोसळत होत्या. कमळी आणि मुलं घाबरून रडायला लागली. तेव्हा घरातील सर्वजण उभ्या पावसातच बाहेर पडले. पावसाला घाबरून आळीतील सर्व लोकांनी आपल्या घराचे दरवाजे बंद करून आत बसले होते. गस्तीने कमळीला व मुलांना घेवून शेजारच्या घराच्या कट्टयावर आणून सोडले. घरातील सर्व वस्तू एका कोप-यात ठेवल्या. इतक्यात घराच्या भिंती धाड धाड कोसळल्या तेव्हा कोसळणा-या पावसामुळे घराची होत असलेली दुर्दशा बघण्यापलिकडे काहीच त्यांना करता येत नव्हते. तसेच पडणा-या घराकडे पाहत राहिले.

असे कितीतरी प्रसंग "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथामध्ये आलेले आहेत. बेरडमधील प्रसंग वाचताना आपल्या अंगावर देखील काटे उभारतात. भावोत्कट असणारी प्रसंग चित्रे जागोजागी असल्यामुळे वाचकही त्या प्रसंगांशी एकरूप होऊन जातो. काही प्रसंग मानवी हृदयाला चटका लावणारे आहेत. आलेल्या प्रसंगाच्या अनुभवाचे गाठोडे बेरड या आत्मचरित्र ग्रंथात सोडले आहे. म्हणून हे बेरड आत्मचरित्र वाङ्मयीन दृष्टया महत्वपूर्ण ठरले आहे.

7. **भाषाशैली**

डॉ.भीमराव गस्ती यांनी आपल्या "बेरड" या आत्मचरित्र गंथामधील भाषा साधी आणि सोपी वापरली आहे. ज्यावेळी आपण त्यांच्या आत्मचरित्राचा वाङ्मयीनदृष्टया अभ्यास करतो त्यावेळी त्यांच्या भाषेत आपणास कोठेही गुंतागुंत दिसून येत नाही. बेरड या आत्मचरित्र ग्रंथात जी जी व्यक्तिरेखा आलेली आहेत त्यांचे स्वभाववैशिष्टये टिपण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी असल्याचे आपणाला दिसून येते. त्यांच्या भाषेत आपणास कोठेही कृत्रिमपणा दिसून येत नाही. त्यांची भाषा एकंदर संवेदनाप्रधान आहे. त्यांची भाषाशैली साधी असल्यामुळे आत्मचरित्र ग्रंथातील प्रसंग, व्यक्तिरेखा, संवाद,

संघर्ष व वातावरण चित्रण सरळपणे कालानुक्रमे आहेत· त्यांची भाषाशैली व्यक्तिरेखांना जिवंत करण्यास उपयोगी पडले आहे· ठिकाणाचे, व्यक्तिच्या प्रसंगाचे, भावनांचे किंवा विचारांचे बारकावे टिपणारी त्यांची भाषा आहे· त्यांच्या या भाषाशैलीमुळेच संवाद, प्रसंग, संघर्ष, व्यक्तिरेखा व वातावरण चित्रण उठावदार झाले आहे· त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथामध्ये अलंकारिक भाषेचा कोठेही उपयोग केल्याचा दिसून येत नाही· डोंगराळ भागात राहणारे बेरड यांची जशी भाषा असेल तसेच त्यांचे संवादही त्यांनी आपल्या ग्रंथात वर्णिले आहेत·

त्यांच्या या आत्मचरित्र ग्रंथामध्ये कन्नड भाषेतील काही वाक्य आपणस वाचावयास मिळतात· लेखकाला पण म्हणावे तसे जमत नाही· तेव्हा त्यांच्या या भाषाशैलीमुळेच बेरड लोकांचे दुःख, दारिद्र्य, व्यथा, वेदना व समस्या इत्यादींची आपणाला कल्पना येते· पोलिसांच्या अत्याचारामुळे प्राणास मुकणा-या बेरड लोकांची परिस्थिती हे नेमकेपणाने साध्या आणि सोप्या भाषेत वर्णिले आहे· या त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथामध्ये साक्षर व निरक्षर लोकांचे संवाद, संघर्ष व व्यक्तिरेखा हे भाषेमुळेच महत्वपूर्ण ठरले आहेत· गस्ती यांनी जे भोगले, जे सासले, जे अनुभवले त्याच गोष्टीचे वर्णन करण्यात ते यशस्वी झाले आहेत· अनेक डोंगराळ भागातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी त्या लोकांशी संपर्क साधला आहे· त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे· त्यांच्या भाषाशैलीतून व्यक्तिमत्व व मन सदैव साकार होत असल्याचे आपल्या लक्षात येते, त्यांची भाषा कोणतेही प्रसंग आपल्या नजरेसमोर हुबेहूब उभे करते· त्यामुळे या ग्रंथास कलात्मक उंची लाभली आहे· उदा·"माज्या पोरास्नी म्हातारी कोतारी न होऊ देता भरल्या सौसारातून तू का नेलंस रं देवा ? त्येच्यापरास मास का बोलावून घेटलं न्हाईस ? आता माझं काय राहिलं हाय ? कशाला जगू रं देवा। सोन्यासारखी पोरं गेली भरलं सौंसार सोडून।"

अशाप्रकारे बेरड लोकांच्या बोलीभाषेत त्यांच्या व्यथा वर्णिल्या आहेत· त्यामुळे या ग्रंथाला वास्तव जीवन दर्शनाचे मूल्य लाभले आहे·

गस्ती यांचे लेखनवैशिष्टये म्हणजे जसे प्रसंग घडवितात जसेच्या तसे त्या त्या भाषेत वर्णन केल्याने बेरड लोकांचे जीवन आपल्या लक्षात येते· त्याचबरोबर

त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व, स्वभाव, वैचारिक पध्दती व त्याचे वागणे ही इत्यादींचे दर्शन घडते· त्यामुळे ती माणसं आपल्यावर होणारा अन्याय कसा सहन करतात, डोंगराळ भागात भट्टीवरून दारू आणून झोपडीत बसून विकायचे, जंगलातील लाकूडफाटा गोहा करून तो विकून त्यावरच आपला उदरनिर्वाह या चालवित होते· इत्यादींचे चित्रण करताना त्यांची भाषाशैली उपयोगी पडली आहे· उदा·सत्यव्वा डोंगरातून दारू आणून विकून त्यावर घरखर्च चालवित होती· सत्यव्वाला जोगतीण म्हणून देवीला सोडले असल्यामुळे तिचे लग्नाऐवजी नात्यातीलच मुलाशी उडकी लावून दिले· दारू पिण्यासाठी तिच्याकडे पिणारे येतात· तेव्हा ती म्हणते, "पैसे हायती न्हवं ? उधारी नकं बा|"

"किती पायजेत पैसे ।"

"गुमान इथनं जा, नाय तर बरं होणार नाय|"

"हात धरला म्हणूनशान काय झालं ? तू जोगतीण नव्ह गावची ? पैसे मोजलं की झालं· लै दिमाख दावू नगंस|"

"जोगतीण झाली म्हणून मी का तुझी रांड होवू व्हय ?" अशाप्रकारे त्यांनी प्रसंगाला अनुसरूनच भाषेचा वापर केल्याचा आपल्या लक्षात येते· त्याशिवाय त्यांनी संवाद, प्रसंग, संघर्ष इत्यादीचे वर्णन बोलीभाषेत आल्यामुळे हे आत्मचरित्र ग्रंथ दर्जेदार व उठावरदार झाले आहे· उदा·लेखकाचे वडील लेखकाच्या मामीला म्हणतो, "आक्का, येवढंच पुरं, तू दिलं नाय म्हणून आमी राग धरणार नाय, आमासनं देवानं मोप दिलेलं हाय· त्यामधी आमी समाधानी हाय· कोण दिलेलं जनमभर पुरणार हाय व्हय ? तव्हा तू कसली सुध्दीक काळजी करू नगस आणि मनालाबी लावून घेवू नगस· तुझी पोरगी आता आमची पोरगी झाली·"

आपणाला माहीत आहे की एखादी व्यक्ती आपणच आपले जीवन चरित्र लिहून काढते· त्यालाच आत्मचरित्र असे म्हणतात· उदा·"उपरा"कार आमदार लक्ष्मण माने, "उचल्या"कार लक्ष्मण गायकवाड, "झोंबी"कार प्रा·डॉ·आनंद यादव, "बलुत"कार दया पवार, तराळ-अंतराळ - शंकरराव खरात, काटयावरची पोटं - उत्तम बंडू तुपे यांची आत्मचरित्र या प्रकारची ठळक उदाहरणे आपणाला देता येतील· अशाच प्रकारे डॉ·भीमराव गस्ती यांचे आत्मचरित्र आठवणी व्दार अनुभवाचे विश्लेषण करण्यातून साकार झाली आहेत· आत्मचरित्रातील घटनात सुसंगती असावी लागते तर सुटेपणा

हा आठवणींचा विशेष असतो· डॉ·गस्ती यांच्या आत्मचरित्रात अनेक ठिकाणी आपणाला सुटेपणा जाणवतो· विशेषतः त्यांनी आपल्या बेरड चळवळीत भाग घेण्याविषयी त्यांनी आपल्या बेरड समाजातील लोकांना पाठविलेल्या पत्रावरून आपल्या लक्षात येते·

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या बेरड या आत्मचरित्रात शालेय जीवनापासून ते सामाजिक कार्य करताना त्यांना आलेले अनुभव समरसतेने सांगताना आढळतात· वर्गात शिक्षक व विद्यार्थी मित्रांकडून मिळणारी वागणूक· आपले वडील, आजी, आई व मामी यांच्या आठवणी अत्यंत भावपूर्ण वर्णिल्या आहेत· त्यांच्या आत्मचरित्रामध्ये आठवणींच्या घाटाचा सत्यपणा व प्रांजळपणा हा महत्वाचा विशेष होय· त्यांच्या आत्मचरित्रामध्ये कल्पकतेचा रंग आपणास कोठेही आढळून येत नाही· जे आहे ते सत्य सांगितले आहे· उदा·देसाई गुरूजींनी गस्तींच्यावर घेतलेला आरोप तो म्हणजे, त्यांच्या विहीरीजवळ जी घाण केली होती, तिचा वास यामुळे त्यांना अक्षरशः शिसारी येत होती· खूपच दुर्गंधी येत होती· ती घाण गस्तींना हाताने उचलून टाकावयास लावली· त्यावेळी शिक्षक व विद्यार्थी मित्रांकडून मिळालेली वागणूक यांचे चित्रण परिणामकारक केले आहे·

आपल्याच जातबांधवांनी पुढा-यांचे ऐकून त्यांच्यावर केलेला प्राणघातक हल्ला केला· याचे सत्य व प्रांजळ वर्णन केले आहे· अशा या सुटया सुट्या आठवणीतील भावपूर्ण जीवनदर्शनाच्या धाग्यांनी गस्ती यांना आपल्या जीवनरूपी महावस्त्रांचा एक योजनाबध्द आलेख चित्र काढून दाखविण्यात यशस्वी झाले आहेत· त्यातील म्हणजेच या आत्मचरित्रातील काही प्रसंग अत्यंत हृदय स्वरूपाचे दर्शन घडविले आहे·

त्यांच्या आत्मचरित्रामध्ये आठवणींचा सुटेपणा हा विशेष असला तरी लेखकाच्या निवेदन कौशल्यामुळे त्यातील सुटेपणाने रस भंग होत नाही· त्यांनी अनुभवाचे निवेदन अतिशय कौशल्यपूर्ण रीतीने वर्णन केले आहे· वाचकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे· उदा· "कुठ हाय तुझा त्यो नवरा ? कुठ दडवून ठेवली हायीस बोसडी ?"

कमळी बेरड लोकांना म्हणते, "घरात लपून बसायला ते काही षंढ नाहीत· आपल्या काही कामासाठी बेळगावला गेले आहेत सकाळी। बेळगावला जावा आणि सापडतील

तेथे त्यांचा खून करून तुमचे हात कलंकित करून घेवा जावा। ते मेले तरी मी माझं कपाळावरचं कुंकू पुसणार नहयी।" ·

यासारख्या संवादामुळे वाचकांची भावस्थिती कायम ठेवून त्यांची उत्कंटा शिगेस पोहोचविण्याचे काम गस्ती यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये केले आहे· आत्मचरित्रकार स्मृतीत आपल्या व्यक्तिमत्वाचे रंग-अनुभवाचा गाभा ओतून चित्रण केल्यामुळे त्यांचे बेरड हे आत्मचरित्र वाङ्मयीनदृष्टया महत्वपूर्ण ठरले आहे· अनुभवांचे वेगळेपण व सजीवता हे निवेदन कौशल्यामुळे प्राप्त होणारे, त्यांच्या आत्मचरित्राची भाषाशैली आपल्या लक्षात येते· त्यांच्या आत्मचरित्रामधील वर्णन एक प्रकारची प्रामाणिकपणा आणि ओतप्रोत भरलेला बेरड समाजाविषयक जिव्हाळा आढळतो· त्यामुळेच ते बेरड समाजामध्ये सामाजिक जागृती करू शकले·

डॉ·भीमराव गस्ती यांच्या अंगी अभिजात गुण असल्याचे आपणाला त्यांच्या आत्मचरित्रावरून लक्षात येते· स्वानुभवाने कोणताही विचार पक्का झाल्यावर दुस-यास पटवून देण्यासाठी विविध प्रकारचे संवाद, संघर्ष व प्रसंग वर्णिले आहेत· त्यांच्या या गुणालाच अभिजात वाङ्मयीन गुण असे म्हणतात· त्यांनी आपल्या आत्मचरित्र ग्रंथाच्या वर्णनात व विवेचनात काही भाषा वापरल्याचे आपल्या लक्षात येते·
उदा·"पावण्या, नम्म उरुगा बाळं क्यट उराग्येतप्पा"
म्हणजे, (पावणं आमच्या गावात फार वाईट घडलं आहे) असा वरील वाक्याचा अर्थ आहे· "येन आग्येती अदररे हेळीरीला, नीवा हेळीद मेले नन्नगा तिळीदुला"
म्हणजे (काय झालं आहे ते तरी सांगा, तुम्ही सांगितलं तरच मला समजणार ?) असा वरील वाक्याचा अर्थ आहे·

त्याचप्रमाणे त्यांच्या या आत्मचरित्रात छोटी छोटी वाक्यरचना असल्याचे आपणास समजते· त्याचबरोबर त्यात साधी सोपी वाक्यरचना असल्याचे आपणास आढळून येते· त्यामुळे भाषेला एक प्रकारचा गोडवा प्राप्त झाला आहे· अनुभवाच्या अभिव्यक्तिला समर्पक शब्दाची साथ मिळाली आहे· त्यामुळे आत्मचरित्राचा आशय व्यक्त करताना कोठेही अडथळा निर्माण झालेला नाही· त्यांच्या लेखनात आपणास दुर्बोधता कोठेही आढळून येत नाही· गस्ती यांच्या आत्मचरित्रातील अनुभव म्हणजे दर्दभरी भावस्पंदनेच

आहेत· त्यांच्या या आत्मचरित्र ग्रंथामध्ये सात्विकतेच्या भावनेचे रंग जागोजाग विखुरलेले आपणास दिसतात· त्यांच्या चुलत्यांचा मृत्यू हा पोलिसांच्या मारामुळे झाला आहे· आईवडिलांच्या प्रेमाला पोरके झालेला त्यांचा चुलत भाऊ लगमाण्णा हा ही पोलिसांच्या मारामुळेच मरण पावला· यल्त्या कारखान्यातील वॉचमनच्या गोळीला बळी पडला आहे· त्यांच्या मांडीत देखील बंदुकीच्या गोळ्या तशाच होत्या· बदंुकीच्या छिद्राने सगळ्या अंडरवेअरला छिद्रे पडलेली होती· त्याच्या अंगाची नुसती चाळण झाली होती·

त्यांच्या आत्मचरित्र ग्रंथामध्ये अलंकार, कल्पकता व विनोद इत्यादींचे चित्रण कोठेच दिसत नाही· सुखदुःखाचे क्षण हेच आनंदाचे क्षण मानणारे हे एक सहृदय कलावंताचे मन आहे हेच खरे| असे म्हणावे लागेल· अशाप्रकारची भाषाशैली आपणास त्यांच्या "बेरड" या आत्मचरित्र ग्रंथात असल्याचे आढळून येते· भाषाशैलीच्या कौशल्यामुळेच हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरला आहे· तेव्हा एका प्रयत्नवादी बेरड समाजाच्या लेखकाचे आत्मचरित्र मराठी वाङ्मयात अपूर्व ठरण्यासारखे आहे· नऊ-दहा पुरस्कार मिळालेल्या[8] या ग्रंथाचे वाङ्मयीन मूल्य थोर आहे· आशय विषय आणि अभिव्यक्तीची एकरूपता व वास्तव जीवनदर्शनाची प्रभावी संधी व सहजसुंदर भाषा हेच या ग्रंथाचे खरे वाङ्मयीन सौंदर्य होय·

## आक्रोश या आत्मचरित्र ग्रंथाचे वाङ्मयीन विवेचन

### 1· कथानक

डॉ·भीमराव गस्ती यांच्या जीवनाचा पूर्वार्ध "बेरड" या त्यांच्या आत्मचरित्रपर ग्रंथात केलेला असून त्यांच्या जीवनाचा उत्तरार्ध "आक्रोश" या आत्मचरित्रपर ग्रंथात गुंफला आहे· स्वतःच्या जीवनाबरोबर आपल्या समाजाचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे चित्रण आक्रोश या त्यांच्या आत्मचरित्रात गुंफले आहे

स्वतःच्या जीवनाबरोबर आपल्या समाजाचा संपूर्ण चित्रपट या चरित्रात उभा केला गेला आहे·त्यांच्या आत्मचरित्रात जातीपातीची, मागासलेपणाची, दारिद्र्याची पाळेमुळे किती खोलवर जाऊन पोहचतात याचेही त्यांनी वर्णन केले आहे· इ·स·1918 मध्ये आपली पेशवाई बुडाली· आणि इंग्रजी राजवट सुरू झाली· कायदा आणि सुव्यवस्था

यांचा डांगोरा पिटण्यात आला· गुन्हेगारी नाहिशी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने अत्यंत कडक धोरणांचा अवलंब केलेला होता· त्या काळात पेंढारी, ठग, बेरड §रामोशी§ ही सर्वजमात पिढयान्पिढया दरोडे घालून आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करीत होती· परंतु त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न कधीच सोडविला नाही· जबाबदारी घेतली नाही· परंतु जे गुन्हेगार असत· त्यांच्यासाठी स्वतंत्र वस्त्या निर्माण करून तारेच्या कुंपणात अडकून ठेवण्यात आले· चावडीमध्ये दिवसातून तीन वेळा हजेरी देण्याची सक्ती करण्यात आली होती· ती एक प्रकारची नजरकैदच होती· हे नाहिसे करण्यासाठी बेरड समाजाला आक्रोश करावा लागला·

त्यांच्या खाण्या-पिण्याचा, शिक्षणाचा, आरोग्याचा प्रश्न सोडविण्याचा कधी प्रयत्न केलाच नाही· केवळ आश्वासने दिली जात होती· पिढयान्पिढया चोरी दरोडेखोरी-वरच उपजीविका करणारी ही जमात भयानक दारिद्र्य अवस्थेत जीवन कंठित होती· शिक्षणाचा गंध नव्हता· बाहेरच्या समाजाशी कधी संबंध येत नव्हता· त्यांना कधी मिसळून घेण्यात येत नव्हते· दरोडेखोर म्हणून समाजात बहिष्कृत ठरले गेले होते· अज्ञान देवाधर्माच्या अनिष्ट प्रथा, व्यसनाधीनता हीन दर्जाला पोहोचलेला संसार· संसारात चालणारे अनेक व्याभिचारी व गुन्हेगार म्हणून समाजाने मारलेला शिक्का, पोटाची आग शमविण्यासाठी हलकी फुलकी कामे करणे, ताडी गाळणे, दारूच्या भट्टया लावणे, चो-या करणे, खून करणे हे सर्व धंदे नित्याचे होवून बसले होते· याचेही वर्णन "आक्रोश"च्या उत्तरार्धात केले आहे·

बेरड समाजातील दारिद्र्य व अज्ञान यामुळे या समाजातील नीतिमूल्येच लयाला गेली होती· पशुतुल्य जीवन जगणे या पलिकडे त्यांना बाह्य जगाची ओळखच नव्हती· बेरड समाजामध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी डॉ·भीमराव गस्ती यांना अपमान सहन करावा लागला आहे· तसेच पोलिसांचा अत्याचार व त्या अत्याचाराला प्रोत्साहन देणारे पुढारी मंडळी, त्यात हाल बेरड समाजाचे याचे वर्णन त्यांनी हृदयस्पर्शी केले आहे· गस्तींनी चळवळ बेरड समाजासाठी केली आहे· त्यात त्यानी स्वार्थ पाहिला नाही· एवढेच नव्हे तर स्वतःच्या संसाराचाही विचार केला नाही· यामुळे त्यांची चळवळ वाढत चालली होती· तसेच लोकांच्या ब-याच समस्या सुटल्या होत्या· त्यामुळे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गस्ती नावारूपास येत होते· अनेकांनी केवळ वाईट भावनेने त्यांची बदनामीही केली आहे· त्यांना खूपच छळले गेले आहे· अनेक संकटाच्यावेळी मान्यवर मंडळी त्यांच्यापाठीमागे खंबीरपणे उभी होती· त्यांचेही वर्णन यात केले आहे· सरकारने कारखान्यासाठी लोकांच्याकडून जमिनी घेतल्या· पण त्याचा मोबदला मिळविण्यासाठी त्यांना अनेक वेळा मोर्चा काढावा लागला· तसेच देवदासी म्हणून तरूणी सोडल्या जात होत्या· त्यामुळे देवदासींची संख्या वाढत चालली होती· यामुळे या देवदासी अनेक प्रसंगांना बळी पडत होत्या· देवदासीना आवश्यक गरजा मिळत नव्हत्या· त्यासाठी शासकीय कार्यालयावर अनेक वेळा मोर्चा नेवून देवदासींच्यासाठी नवनवीन योजना राबविण्यात आल्या· पोलीस अत्याचार नाहिसा करण्यासाठी बेरड समाजाला खूपच त्रास द्यावा लागला· यात प्रामुख्याने सिंहाचा वाटा गस्तींचा होता· तेव्हा या सर्व गोष्टीसाठी आक्रोश करावा लागला·

गस्तींनी आपल्या चळवळीमध्ये ज्या घटना घडल्या त्याच त्यांनी लिहून काढल्या आहेत· त्यालाच आक्रोश हे नाव दिले·

एक एक वेळ पोटात अन्नाचा कण नसलेल्या, भूकेने व्याकूळ झालेल्या बेरड समाजाला अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागते· बेरड वृत्तीने भयाण दारिद्र्याला तोंड देणा-या या समाजाचा पोलिस खात्याकडून अमानुष छळ होत होता आणि सामाजिक दृष्टया निराधार असलेल्या या समाजाला प्रस्थापिताकडून कोणत्याही प्रकारचा आधार मिळण्याची शक्यत नव्हती· तसेच आपल्या स्वकीय जात बांधवाकडून त्यांना जीवन जगण्यासाठी कोणतेही सहाय्य्य होत नसे· या सर्व आपत्तीतून वाट काढून जीवन विकासाच्या नव्या वाटा शोधण्यासाठी या लोकांना चळवळ उभारावी लागली· संघर्ष करावा लगाला· बेरड समाजाच्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भीमराव गस्ती यांनी चळवळीमध्ये सक्रिय भाग घेतला आहे· स्वतःच्या सुखाची पर्वा न करता जो त्यांनी आपल्या समाजासाठी संघर्ष केला त्याचे परखड व वास्तववादी चित्रण "आक्रोश" या त्यांच्या आत्मचरित्रात केले आहे· कठोर सत्याचे एवढे परखड वास्तव चित्रण अन्यत्र आढळणे कठीणच|

विविध पात्र व प्रसंगांच्या सहाय्याने या चळवळीचा सामाजिक तपशील प्रत्ययकारी झाला आहे. एक सामान्य माणूस आपल्या अंतरंगातील सामाजिक जाणिवेशी प्रामाणिक राहून हिमालयाएवढे सामाजिक कार्य कसा उभा करू शकतो याचा आदर्श म्हणजे भीमराव गस्ती यांचे जीवन व कार्य होय. चळवळीची घटनात्मक हकिकत हाच "आक्रोश"चा कथात्मक भाग आहे.

1. पोलिसांशी लढा

2. देवदासींची समस्या

3. अंधःश्रध्दा निर्मूलन चळवळ

4. कारखानदारी विरूध्द संघर्ष

5. रामोशी समाजासाठी जातीचे दाखल्यासाठी केलेले आंदोलन.

या प्रमुख घटनाभोवती आक्रोशचे कथानक फिरत असून त्या अनुषंगाने अनेक व्यक्ती या चरित्रात डोकावल्या आहेत. बाबा आढाव, नानासाहेब गोरे, बंबरग्या, प्रा. बन्ने, कालेरी शिवाप्पा, कमळी, देशपांडे गुरूजी या पात्र चित्रणाच्या पार्श्वभूमीवर गस्तींचे जीवन चित्र डोळ्यात भरते. मालती या भीमराव गस्तींच्या विवाहाची समस्या हा ही आक्रोशमधील विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. पोलिस खात्यातील जावई केल्यास समाजाचा छळ कमी होईल असे गस्तींच्या आईला व पत्नीस वाटते. तर ज्यांनी आपल्या समाजाचा अनन्वीत छळ केला, त्यांच्या घरात आपली मुलगी द्यायची नाही असा भीमरावाचा हट्ट होता. पण याबाबतीत भीमरावाचा शेवटी पराजयच होतो. कारखानदारानी बेरडांच्या जमिनी घेतल्या, त्याबद्दल घरटी एक माणूस कारखान्यात नोकरीस घेण्याचे ठरले होते. परंतु याबाबत कारखानदारांनी दाखविलेला अविश्वास व त्यासाठी गस्तींने केलेले आंदोलन व केलेला आक्रोश या चरित्र-कथानाचा आणखी एक ज्वलंत विषय आहे. कर्नाटकातील असंख्य देवदासींच्या समस्या सोडविण्यासाठी घेतलेले मेळावे, केलेला संघर्ष व शासनाकडे मागितलेली दाद या संदर्भात गस्तींनी केलेले नेतृत्व कसे संघर्षमय झाले होते याचाही तपशील आक्रोशमध्ये आलेला आहे.

आक्रोशमधील कथानकाच्या व पात्र वर्णनांच्या पार्श्वभूमीवर गस्तींचे व्यक्तिचित्रण उठावदार झाले आहे. हाच आक्रोशचा कथाभाग होय.

2· व्यक्तिचित्रणे

"बेरड व आक्रोश" या आत्मचरित्राची हकीकत ही अशाच अगदी साध्या सरळ, सोप्या भाषेत चालू लागते, बोलू लागते· यातील व्यक्तिचित्रणे कालक्रमाचे सूत्र धरून पुढे जात असतात· त्यांच्या हालचाली व पाहणे-बोलणे हेच इतके अर्थपूर्ण होते की, अलंकार व भारी वस्त्रे नसूनही व्यक्तिचित्रणे आकर्षक ठरतात· व्यक्तिचित्रणातून एकमेकाबद्दलची सहानुभूती नकळत होते· नंतर नंतर सहानुभूती वाढत जाते· प्रेम, वात्सल्य व कारूण्य या व्यक्तिचित्रणातून आपणास दिसून येते· या तीन महानद्यांच्या संगमावर हे "बेरड" व आक्रोश आत्मचरित्र वाचकांना केव्हा घेऊन जाते हे ही कळत नाही· वाड्मयीनदृश्टया "आक्रोश" आत्मचरित्र महत्वपूर्ण ठरले आहे·

"आक्रोश" या आत्मचरित्र ग्रंथाचे वैशिष्टये नजरेत भरते ते म्हणजे त्यातील व्यक्तिचित्रण कौशल्यामुळे ठसठशीतपणा, जिवंतपणा त्यामध्ये आहे· "आक्रोश"मध्ये व्यक्तिचित्रणांचे गुण यथार्थ वर्णन व बोलीभाषेतील संवाद यामुळे आले आहे· कोणत्याही यशस्वी कलाकृतीत ते याच पध्दतीने येत असतात· आजीचा मायाळूपणा व जिवापाड प्रेम करणारी वृत्ती, सर्व सुखाचा त्यागी स्वभाव सहजपणे कमळीमध्ये दिसून येतो· कधी कधी आईवडील भडकतात· याचेही वर्णन केले आहे· संसाराची जबाबदारी संभाळून घरी येणा-या माणसांची सेवा करणारी कमळीचेही चित्रण आले आहे· होणारा त्रास सहन करण्याची सोशिकता तिच्यात आहे· बेरड लोकांच्यासाठी कार्य करण्यास गस्तींच्या घरातील लोकांचा विरोध असतो· त्याचप्रमाणे राजकीय पुढारी व स्वकीय जातबांधवाकडून देखील त्यांना विरोध झाला आहे· पण त्यांचे मोठे मन मात्र त्यांना पाठिंबा देते·

आत्मचरित्रात्मक ग्रंथ लिहिणे हे जितके सोपे आहे तितकेच अवघडही आहे· गस्तींनी बेरड समाजात जागृती निर्माण करताना जे आलेले अनुभव आहेत तेच अनुभव त्यांनी आपल्या "आक्रोश" या आत्मचरित्रात वर्णन केलेले आहेत· आपल्या समजल्या गेलेल्या व्यक्तींबद्दलही वर्णन केले आहे· उदा·कमळी, प्रा·बन्ने, देशपांडे, गुरूजन, कालेरी शिवाप्पा, आईवडील, निंगाप्पा, आजी, बाबा आढाव, प्रा·माने,

नानासाहेब गोरे, काशी, बंबरग्या व देवदासी स्त्रिया इत्यादी व्यक्तिचित्रणे यात आलेली आहेत. गस्ती त्यांच्या अंतरंगाचे दर्शन घडविण्याच्या प्रयत्नात रमलेले नसतात.

समाजाभिमुख वृत्तीने जीवनभर भीमराव गस्तींनी जीवन संग्रामास तोंड दिले. या संघर्षात ज्या ज्या व्यक्ती आल्या त्यांची व्यक्तिचित्रणे जिवंत व ठोशीव स्वरूपाची आली आहेत. छोटी छोटी व्यक्तिचित्रणेही वैशिष्टयपूर्ण ठरलेली आहेत. ती वास्तव पण काही मुलुखावेगळी व असामान्य आहेत. जी लहान लहान व्यक्तिचित्रणे आहेत पण ती वास्तव आहेत. या गौण व्यक्तिरेखा जरी अपवाद सिध्द करणा-या असल्यातरी त्या सर्वातून बेरड समाजाचे जीवनाचे दर्शन घडते. सहज साध्या बोलीभाषेतून विविध घटना प्रसंगातून प्रतीत होणारी ही व्यक्ती चित्रणे विलक्षण बोलकी व वास्तव आहे.

1. <u>कालेरी शिवाप्पा</u>

कालेरी शिवाप्पाचे धाडसी व लुटारू व्यक्तिमत्त्व बेरड समाजातील दरोडेखोराचे प्रतिनिधित्व करते. बेरड लोक क्रांतिसिंह गंगाधर देशपांडे यांच्या अवतीभोवती असत. त्यांच्या सांगण्यानुसार ही बेरड मंडळी सरकारी खजिना लुटत असत. तसेच तहसील कार्यालय, पोस्ट कचे-या जाळणे, आगगाडी पाडणे, मोठमोठया सावकारांचे घरे लुटणे, आणि ती मालमत्ता नेऊन कॉंग्रेस नेत्यांच्या पायापाशी आणणे इ. कामे करत. कालेरी शिवाप्पा हे गंगाधर देशपांडे यांचा उजवा हात मानला जात होता. बेळगाव, धारवाड, विजापूर जिल्हयात या कालेरी शिवाप्पाने चांगलाच धुमाकूळ घातला होता. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रज सरकारने एक मोठी मोहीम आखली होती. परंतु शिवाप्पा सरकारच्या हाती लागत नव्हता. त्याला पकडण्यासाठी इंग्रज सरकारने खूप प्रयत्न केले पण तो इंग्रजांच्या हातावर तुरी देवून पसार होत होता. शेवटी इंग्रजानी त्याला धरून देणा-यास एक मोठे बक्षीस लावले. या बक्षिसाच्या आहारी जावून कालेरी शिवाप्पाच्या एका नातेवाईक स्त्रीने विश्वासघाताने त्याला पकडून इंग्रजाच्या हवाली केले. इंग्रजानी त्याला फाशी दिले. हा मुख्य माणूसच गेल्यामुळे त्यांचे इतर सहकारीही तुरूंगाची शिक्षा भोगू लागले.

त्या शिवाप्पाला पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी हुळीयूर या गावात बरेच महिने तळ ठोकून होते. अशाप्रकारे गस्तींनी कालेरी शिवाप्पाचे धाडसी वृत्तीचे चित्रण

केले आहे·

2· निंगाप्पा

डॉ·भीमराव गस्ती निंगाप्पाचे व्यक्तिचित्रण साध्या व सोप्या भाषेत केले आहे· गस्तींना एकदा चन्नेटीला जाण्याचा प्रसंग आला· त्या गावाला गेल्याशिवाय पर्याय नव्हता· त्यांच्यावर अनेक प्रसंग आले होते· निंगाप्पा हा कामेवाडीच्या डोंगरातील झाडे तोडायचा आणि ती लाकडे विकून त्यावरच आपला उदरनिर्वाह करत होता· परिस्थितीने कंगाल झालेला हा निंगाप्पा येणा-या प्रसंगाला तोंड देत होता· तो पूर्वी मिलिटरीत होता· परंतु भाऊबंदकीच्या भांडणामुळे त्याच्या संसाराचे वाटोळे झाले होते· `तो ज्या वेळी मिलिटरीत होता त्यावेळी त्याचा संसार सुखात चालला होता· भाऊबंदकीच्या वै-यामुळे त्यांच्याकडे अन्याय सहन करण्याची शक्ती नव्हती· म्हणून त्याने एकाचाखून केला· त्याचबरोबर दुस-याला जखमी केले· या कारणास्तव त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली· हा पहिलाच स्वभावाने साधा व सरळ वृत्तीचा माणूस तो आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून शिक्षा भोगत होता· म्हणून तो बारा वर्षातच बंदिखान्यातून सुटला गेला· त्याचवेळी आणीबाणीच्या काळात मोठमोठया राजकीय पुढा-यांना जेलमध्ये इंदिरा गांधींनी बंद केले होते· तेव्हा त्याला त्या मोठमोठया पुढा-यांच्या संगतीत चांगलेच ज्ञान मिळाले होते· त्यामुळे हा गस्तींच्या चळवळीत भाग घेत असे· त्याने या चळवळीत स्वतःला झोकून घेतले होते· गस्तींचे ते अंगरक्षकच बनले· तीन-चार खेडयातील बेरड समाजातील लोकांना एकत्र करण्याचे काम तोच करत होता· त्यामुळे गस्तींनी त्या गावची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावरच टाकली होती , तो त्यांचा विश्वासू सहकारी होता·

माणसाची परिस्थिती बिघडली की, माणूस आपल्या जीवनाला वैतागतो एकदा का दैव फिरले की, चांगला खाता-पिता माणूसही उघडयावर येऊन पडतो· ज्यावेळी त्या माणसांची चांगली परिस्थिती असते त्यावेळी नात्यागोत्यातील सर्व माणसे मुंग्यासारखे त्याच्याभोवती चिकटून राहतात· पण हीच माणसं ज्यावेळी त्या माणसाला गरिबी येते त्यावेळी कोणीही त्याच्या मदतीला धावत नाहीत· याची साधी जाणीवही लोक

ठेवत नाहीत· असेच जीवन निंगाप्पाचे झाले होते· असा दरिद्री जीवन जगणा-या निंगाप्पाला सरकारकडून मदत मिळवून देण्याचा प्रयत्न गस्ती करतात· पण त्याच्या मिलिटरी सर्व्हिस बुकात त्याने केलेल्या खुनाची नोंद झाली होती म्हणून त्याला नोकरीवरून काढण्यात आले होते, अशा लोकांना सरकारी जमीन कसण्यास देता येत नव्हती·

कामेवाडीत राहणा-या निंगाप्पाच्या घरी दोन मुले आणि एक मुलगी असे पाच माणसांचे कुटुंब· त्यात मोठी मुलगी लग्नास आलेली· निंगापची परिस्थिती पाहून गस्तींनी कर्नाटक इलेक्ट्रिक बोर्डात नोकरीला असणा-या मुलाशी लग्न लावून दिले· त्यामुळे ही एक निंगाप्पाची काळजी दूर झाली· गस्तींच्या जीवाला जीव देणारा हा निंगाप्पा अखेरपर्यंत आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहिला आहे, अशाप्रकारे गस्तींनी निंगाप्पाचे जीवन चित्रित केले आहे·

३· <u>कमळी</u>

बेरड आणि आक्रोश या आत्मचरित्रात कमळीचे स्थान महत्त्वाचे मानले पाहिजे· कारण तिनेही आपल्या पतीला सहकार्य केले आहे· ती स्वभावाने खेडवळ व सुंदर होती· ती आपल्या आईवडिलांना एकटीच ?होती· तसं तिचही शिक्षण झालेलं पण गस्तींनी तिला कोणत्याही प्रकारचे सुख दिले नाही· ते सतत आपल्या सामाजिक कार्यात मग्न असत· तेव्हा घरच्या सर्व जबाबदा-या संभाळून येणा-या जाणा-या माणसांची सेवा ती मनापासून करत असे· आलेल्या माणसांना कधीही चहा अथवा जेवण केल्याशिवाय परत पाठवत नव्हती· गस्ती मात्र आपल्या सामाजिक चळवळीशी एकरूप झाले होते· तेव्हा घराकडे त्यांचे लक्ष कमीच होते· त्यांनी स्वतःच्या संसाराकरिता काहीच केले नव्हते· दोघांनीही सर्व सुखाच्या गोष्टींचा त्याग केला होता· त्यात घरात तीन मुले त्या मुलांची उसाबर कमळीच करीत· त्याच समाजाचा तिलाही खूप त्रास सहन करावा लागला आहे· एवढेच नव्हे तर सासू-सासरे व दीर भावजय या दोघांच्यावर खूपच रागावले होते· अशा अनेक प्रसंगाना कमळी तोंड देत होती· रानातील व घरची सर्व कामे तीच करीत होती· पण आपल्या पतीच्या समाजिक कार्यात कोठेही आडवी आलेली नाही· कमळीचा स्वभाव हा कमळाच्या फुलाप्रमाणे होता·

4· <u>डॉ·भीमराव गस्ती</u>

बेरड समाजात जन्मलेला हा गस्ती· त्यांच्या घरची परिस्थिती बिकट त्यात शिक्षणाची आवड· त्यांच्या वडिलांना देखील शिक्षणाची आवड होती· शिक्षण घेत असताना अनेक परिस्थितीचे चटके त्यांना मोठया प्रमाणात बसलेले आहेत· शाळेत शिकत असताना त्यांना अनेक अपमानाच्या गोष्टी, अनेकांच्या शिव्या खाव्या लागल्या, मारही खावा लागला, एवढेच नव्हेतर विष्टाही हाताने काढणे त्यांना भाग पडले आहे· त्यांनी आपले सर्व शिक्षण पूर्ण केले· वडिलांना वाटत होते आपल्या मुलाने नोकरी करावी· पण गस्तींनी नोकरी न करता या डोंगराळ भागात आदिवासीसारखे जीवन जगणा-या बेरड समाजाचा विकास करण्याचे ठरविले· कारण या बेरड समाजातील लोकांचा धंदा म्हणजे चो-या करणे, मोठमोठे दरोडे घालणे, दारू काढणे तसेच पोलिसांचा मार खाणे हा होता· हे सर्व घडत होते त्यांच्या अज्ञानपणामुळे· तेव्हा असेच जीवन जगण्यात त्यांचे आयुष्य नाहिसे होणार म्हणून गस्तींनी अनेक प्रकारच्या चळवळी करून या बेरड समाजाला अन्यायातून मुक्त केले आहे·

देवीला सोडल्या जाणा-या देवदासी स्त्रियांचे भवितव्य लक्षात घेवून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारी कार्यालय व मंत्र्यांच्या समोर या देवदासींच्या व्यथा मांडल्या तेव्हा कुठे शासन जागे झाले· तेव्हा गस्तींनी देवदासींची एक संस्थाही स्थापन केली आहे· आता या स्वावलंबी जीवन जगत आहेत· त्याचप्रमाणे त्यांच्यात एक प्रकारची जागृतीच निर्माण केली· त्यांनी अंधःश्रध्देच्या विषयी माहिती पटवून सांगितली· हे सर्व कार्य करीत असताना अनेक राजकीय व स्वबांधवाकडूनदेखील विरोध झाला आहे· अनेकांनी त्यांना जीवे मारण्याच्याही धमक्या दिल्या आहेत· पण या धमकीला न घाबरता ते आपले कोर्य करीत राहिले त्यामुळे बेरड समाजातील लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसला होता· त्यामुळे गस्ती आपले कार्य यशस्वी करू शकले· यामुळे देवीला सोडल्या जाणा-या मुलींची संख्याही कमी झाली·

बेरड लोकांना पोलिसांच्या अत्याचारापासून वाचविण्यासाठी रात्रं न दिवस न म्हणता झटले आहेत· राजकीय पुढा-यांचा सूड भावनेचा विचार या सर्व प्रसंगांना

त्यांनी धीटपणे तोंड दिलेले आहे· हेही आपल्या लक्षात येईल· ज्या कारखान्याने बेरड लोकांच्या जमिनी घेतल्या आणि त्यांना सांगितले की, आम्ही तुम्हा लोकांना या कारखान्यात कामाला घेऊ पण शेवटी या लोकांना कारखान्यात कामाला घेण्याचे डावलले होते· तेव्हा त्यांची झालेली दैन्य अवस्था पाहून गस्तींनी या लोकांच्या समस्यास त्या कारखान्याच्या व्यवस्थापकांच्या समोर मांडल्या· याबाबत अनेक मंत्री महोदयांसमोर गा-हाणे मांडली· तेव्हा कुठे या लोकांना न्याय मिळाला· या सर्व गोष्टी मिळविण्यासाठी समाजाला आक्रोश करावा लागला· तसेच या सर्व बेरड लोकांना आदिवासीमध्ये समाविष्ट करण्यास सरकारला भाग पाडले आहे· तेव्हा गस्ती हे या दोन्ही आत्मचरित्रात्मक ग्रंथाचे नायक आहेत· त्यांनी आपल्याला आलेले अनुभवच चित्रित केले आहेत·

3· प्रसंग

"आक्रोश"मधील प्रसंग हृदयस्पर्शी व परिणामकारक आहेत· उदा· गावालगत असलेल्या कारखान्यामुळे भूमीहीन झालेल्या कुटुंबातील लोकांचे पुनर्वसन काम करीत असताना बाहेरच्या लोकांपेक्षा स्वकीय मंडळींचा व जातपंचायतींचा खूप विरोध झाला· त्यांच्यावर तीन वेळा मारेकरी घातले· यामुळे गस्तींच्यात जिद्द वाढत गेली· गुन्हेगार लोकांत वावरत असल्यामुळे गस्ती अनेक सुशिक्षितांना, मित्र मंडळींना परका झाला होता· कॉंग्रेसचे नेते जी·एस·मळगली, यांनी कार्यक्रमा संदर्भात भेटावयास गेले असता तो प्रसंग·, माईने स्वतःला जाळून घेतल्याचा प्रसंग हृदयद्रावक आहे· गोंधा नाईकाची पोरगी भागी मुसलमानाच्या कादरने पळवून नेली· रामा नाईकाची व्यथा कंच्या देवानं हया बेरडासन जलम दिलाय ? यातील काही प्रसंग ठेकदार बेरडांना त्रास देण्यासाठी वेगवेगळे तंत्र अवलंबित होता आणि त्यांना पोलीसांच्या जाळयात अडकवू पाहात होता· हा प्रसंग किती भयानक आहे ? चलनट्टीस जात असताना गस्तींच्या पाठीमागे साप लागलाहोता· त्यावेळी त्यांची झालेली अवस्था· राजगोळीच्या पत्रीबसवान मंदिराजवळ जमीदाराची काही मंडळी गस्तीला मारण्यासाठी उभी होती, त्यावेळचा प्रसंग· दड्डीहून घरी परत येत असताना त्यांना आलेले प्रसंग व दुकानदाराने उधारीने माल देण्याचे बंद केले होते त्यावेळचा प्रसंग· घरात धान्य नाही म्हणून मूल्यवान ग्रंथ तीन हजार रूपये किंमतीचा जुन्या पुस्तकांच्या दुकानात पाचशे रूपायाला विकली कारण त्यांच्या

डोळ्यासमोर घरातील उपाशी पोरे दिसत होती· हा प्रसंगही किती धक्कादायक आहे· सांगलीच्या मेळाव्याहून परत येत असताना मिरज स्टेशनवरच मुक्काम करावा लागला· फरशीवर वर्तमानपत्रे अंथरूण त्यावर झोपले· असे कितीतरी प्रसंग डॉ·भीमराव गस्तींच्या व बेरड समाजातील लोकांच्यावर आलेले आहेत· भावोत्कट असणारी प्रसंगचित्रे जागोजागी असल्याचे वाचकांचे हृदयदेखील हेलावून जाते· "वर्ण व्यवस्था" व सामाजिक शोषण ही या साहित्याचा कणा[9] आहे असे म्हणणे या "आक्रोश" आत्मचरित्रावरून पटते·

4· संघर्ष

डॉ·भीमराव गस्ती यांनी लिहिलेले "आक्रोश" ही आत्मकहाणी पूर्णपणे संघर्षाने भरलेली आहे· हे आत्मचरित्र त्यामुळे जणू दुःखनिवेदनच ठरावे असे आहे· या व्यथा एका व्यक्तीच्या नसून संपूर्ण बेरड समाजाच्या आहेत· यातील व्यक्ति वैशिष्टय महत्त्वाचे आहे· या व्यथांना वाचा फोडण्याचे काम गस्ती यांनी केले आहे· एक आगळावेगळा ध्येयवादी, झुंजार, आक्रमक स्वभाव या व्यक्तीजवळ आहे· जर असा हा ध्येयवादी नेता बेरड समाजाला लाभला नसता तर बेरड समाजाचे दुःखे कोणी जाणून घेतली नसती· यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला· शतकानुशतके बेरड समाज दरोडे घालणे, दारू काढणे, जंगलातील झाडे तोडून त्याची लाकडे तयार करून विकणे, पोलिसांचा मार खाणे हा त्यांचा नेहमीचा धंदा चालला होता· होणा-या अन्यायाबद्दल तक्रार न करता तो निमूटपणे सहन करीत होते· या सर्व गोष्टींच्याविरूध्द संघर्ष करावा लागला· याच समाजात जन्मलेल्या गस्तींनादेखील अन्यायाविरूध्द आवाज उठवावा लागला· हाच या समाजाचा प्रतिनिधी ठरला आहे· बेरड समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी खालच्या पातळीपासून ते वरच्या पातळीपर्यंत संघर्ष करावा लागला· यावेळी गस्तींनी आपल्या जीवाची व संसाराची पर्वा केली नाही· सतत सामाजिक कार्य करीत राहिले· श्री·शंकरराव खरात लिहितात त्याप्रमाणे - "वास्तविक दलित साहित्य जीवनवादी साहित्य आहे· ते लोकसन्मुख आहे· ते दलित जीवनातील दलित जाणींवाचे दर्शन घडवितात····जीवनापासून तो अलिप्त व वेगळा राहू शकत नाही·[10] आपल्या जीवनशी व समाजाशी असलेली बांधिलकी विसरू शकत नाही· हेच खरे· बेळगाव जिल्हयातील यमनापूर गावचा हा डॉ·भीमराव गस्ती बेरड समाजातील दुःखी जीवन जगणा-या

जाती-जमातींचा प्रतिनिधी म्हणूनही ठरला आहे·

सवर्ण समाजाकडून मिळणारी तुच्छ वागणूक हा एक शापच या बेरड समाजाला ठरला आहे· जन्मापासून त्यांच्यावर अन्याय होतो आहे हे आपणास त्यांच्या "आक्रोश" या आत्मचरित्र ग्रंथातून दिसून येतो· मानवाच्या महत्वाच्या मूलभूत गरजाही त्याना मिळत नव्हत्या· डोंगराळ भागात राहिल्याने बाहरेच्या शहरांशी संबंधच नव्हता· त्यामुळे हा समाज दुःखाच्या खाईत पिळून निघत होता· चोराशिवाय त्यांना कोणी बोलत नव्हते· गुन्हा केलेला असो, निर्दोष असो, सरळ असो वा गुन्हा केलेला नसो त्यांना गुन्हेगार म्हणूनच ओळखत· इतरांची त्या समाजखाकडे बघण्याचा दृष्टिकोणच वेगळा होता· हेच फार मोठे शल्य होते· तसेच देवदासींच्या समस्या व कारखान्यासाठी घेतलेल्या जमिनी त्यामुळे ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांची झालेली दैन्य अवस्था तसेच स्वकीय समाजाकडूनदेखील गस्तींना झालेला विरोध या सर्व गोष्टींसाठी त्यांना संघर्ष करावा लागला आहे·

उदा·धनट्टी येथील चार बेरडांना पोलिसांनी गोळ्या घालून ठार केले होते· यासंदर्भात कलेक्टरनी चौकशीही केली नव्हती· उलट गोळ्या घालण्याचे आदेश त्यांनीच दिले· नंतर लगेच हुलीवरच्या बेरडांवर दरोडयाचा खोटा आळ ठेवून पोलिसांनी खूपच अत्याचार केले· हे पाहून सर्व डोंगराळ भागातील लोक भीतीने थरथर कापू लागले होते· त्यांचा जीवघेणा आक्रोश तेव्हा अन्याय नाहिसा करण्यासाठी गस्तींना समाजाच्या समवेत संघर्ष करावा लागला·

गोंधा नाईकाची पोरगी भागी मुसलमानाच्या कादरने पळवून नेली होती· पैशाला भुलून जातपंच मुसलमानाच्या बाजूला होवून गोंधाला त्रास देत होते· तेव्हा या ठिकाणी गोंधा नाईकाच्या बाजूने गस्तींना संघर्ष करावा लागला त्यावेळी कुठे नाईकास न्याय मिळाला·

तलाठी बेरडांच्याकडून पैसे घ्यायचा कारण तुमच्या नावावर सगळी जमीन लावतो म्हणून · पण जमीन लावली म्हणून कसल्यातरी कागदावर सातबाराचा उतारा लिहून देत· अनेक वर्षे असेच चालले होते· तेव्हा याविरूध्द त्यांना संघर्ष करावा लागला·

बंबरग्या, लक्ष्मण, निंगाप्पा, शिवाप्पा, मन्याप्पा, अर्जून, साधू, महादेव, आप्पाण्णा, गुडया, सूर्याजी अशा अनेक बेरडांनी आपल्या समस्या गस्तींना सांगितल्या पोलिसांचे अत्याचार थांबवावेत, जमीनदारांचे त्रास कमी व्हावेत, शेळ्या-मेंढया पाळण्यासाठी कर्ज मिळावे, पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, जमीन नावावर व्हावी, पीकपाण्याची नोंद करून द्यावी· इत्यादी गोष्टीसाठीही संघर्ष करावा लागला·

"किती माणसांच्या शिव्या खाणार" या लेखातून गस्तींने केलेला संघर्ष आपल्या लक्षात येईल·

कुठं हाय तुझा पोरगा दाखवा, नहीतर तुलाच उघडं करून मारते बघ· बोसडी कुठली· डी·एस·पी· म्हणून कोल्हापूर जिल्हयाला नुकत्याच आलेल्या मीरा बोरवणकर या स्वतः एक स्त्री असून त्या बेरड समाजातील स्त्रियांच्यावर अत्याचार करीत होत्या· त्याचप्रमाणे वृध्द स्त्रियांनादेखील मारहाण करीत होत्या· तसेच गडहिंग्लज पोलिस बेरड लोकांना जनावरासारखे मारत होते· या अत्याचाराविरूध्द संघर्ष करावा लागला·

देवदासींच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाचा दरवाजा ठोठवावा लागला· घरातील लोकांच्या बरोबरही काही वेळा संघर्ष करावा लागला· जोगतिणीच्या व्यथांना वाचा फोडली ती संघर्षानेच· अशाप्रकारे डॉ·भीमराव गस्तीने संघर्ष बेरड समाजातील लोकांच्यासाठी केला· त्यांनी कोणत्याही अपेक्षा बाळगल्या नाहीत· त्यामुळे लोकांच्या ब-याच समस्या सुटल्या· अनेकांनी त्यांना व्देषबुध्दीने बदनाम करण्याचे प्रयतन केले· तेव्हा येणा-या प्रसंगाला सामोरे गेले आहेत· बेरड समाजाबद्दल चळवळ करताना जे अनुभव आले तेच लिहिलेत· म्हणून "आक्रोश" हे त्यांचे आत्मचरित्र संघर्षानेच भरले आहे·

"ज्या साहित्याच्या मुळाशी संघर्ष व क्रांतीकारक परिवर्तन या प्रेरणा असतात त्याला एक आगळेच सामर्थ्य लाभते· ध्येयवादी लेखक जेव्हा आपल्या साहित्यात आपले जीवनसत्व ओततो· तेव्हा त्याचे शब्द शस्त्रापेक्षाही धारदार व परिणामकारक होतात·"[11] याची प्रचिंति भीमराव गस्तींच्या "आक्रोश" च्या संदर्भात यथार्थपणे प्रत्ययास येते·

अशा लेखकांच्या साहित्यकृती लोकांच्या अंतःकरणाला जावून भिडतात· त्यावर आपला खोल ठसा उमटवितात· असेच गस्तींच्या "आक्रोश" बद्दल म्हणावेसे वाटते·

5· <u>संवाद</u>

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या "आक्रोश" या आत्मचरित्रात संवादाची निर्मिती केली आहे· या संवादांना एक वेगळीच अर्थपूर्णता प्रापत झालेली आहे· या संवादामुळेच त्यांचे आत्मचरित्र आपणास अधिक जिवंत वाटते· या आत्मचरित्रातील संवाद बेरड समाजाच्या बोली भाषेत असल्याचे बेरड समाजाच्या परिस्थितीचे यथातथ्य चित्रण घडविणारे आहेत· त्यामुळे "आक्रोश" आत्मचरित्रातील व्यक्तिरेखा आकर्षक व बोलक्या झाल्या आहेत· गस्ती यांनी देवदासींचे संवाद, भूमीहीन झालेल्याबेरडांचे संवाद, जोगतीण यांचे संवाद, स्त्रियांचे संवाद इत्यादींचे चित्रण त्यांच्याच बोलीभाषेत केले आहे· पण पुढारीपणाच्या रूबाबात असणा-यांचे संवाद याचेही त्यांनी मार्मिक शब्दात वर्णन केले आहे·

बेरड समाजची जी बोलीभाषा होती तीच व्यक्तिरेखेनुसार "आक्रोश" या आत्मचरित्रात वापरल्याने त्यांच्या व्यथा वाचकांनाही समजू शकल्या· हेच कौशल्य गस्तींच्या अंगी होते· त्यांचे "आक्रोश" हे आत्मचरित्र अठरा विश्व दारिद्रात जीवन जगणा-या बेरड समाजाच्या व्यथा व त्यावर उपाय संवादाची निर्मिती करून सोडविल्या आहेत म्हणून त्यांची "आक्रोश" हे आत्मचरित्र वैशिष्टयपूर्ण आणि महत्वाचे ठरले आहे·

आपणास "आक्रोश" या आत्मचरित्रातून पुढीलप्रमाणे संवाद निर्मिती दिसून येते -

ज्यावेळी गस्तींची अंगी आणि चड्डी चोरीला गेलेली असते त्यावेळी ते मोठयाने डोंगरातील लोकांसारखे ओरडतात व रडताता आणि आजीस म्हणतात, "अजेSS अजे, माझी अंगी आणि चड्डी नायकी·"
यावर आजी म्हणते - "बायकासारखं का रडतू हैस रं भडव्या ? ते बी इतभर अंगीसाठी। तिया कसला रे बेरड। आणि माझे बेनीचा नातू शोभत न्हैस तू·"

माईने स्वतःला घरात कोंडून घेतले होते. तेव्हा तिने स्वतःला का कोंडून घेतले हे गोंधा नपाईकाच्या पत्नीला म्हणजेच मामीला विचारतात. त्यावेळी ती म्हणते "माझं काय बी मैत नाय रं, पोरा।"
नंतर ती गस्तींच्यावर रागावते अन म्हणते, "कशास पाजे तुझ हे सगळं गावचं उसाबर, ज्यांनी हे राड केलं हाय तेच भोगतील की। आमी दुस-याची काळजी का करतली?"
गस्ती म्हणतो, "माझी करेवाची आण हाय तुला" मामी तुझ्या भागीचं कसं वाटोळे झालं हे विसरलीस ?" मामी म्हणते, "त्याभाडया राम्यानं माईला नासवलं"
हैदराबादच्या विद्यापीठातील मित्र भास्करराव भेटतात त्यावेळचा संवाद हा कौटुंबिक जिव्हाळ्याचा आहे. हे आपणास पुढील संवादावरून लक्षात येईल.

भास्करराव म्हणतात, "तेरा चौदा वर्षापूर्वी तू मला चार हजार रूपये दिले होतेस, त्या चार हजाराचे व्याज किती होते हे तुला माहित आहे का ? तरीही दिलेले पैसे कमीच वाटतात." लगेच भास्कररावांची पत्नीही म्हणते, "भाऊ तुम्ही यांना त्यावेळी केलेली मदत पैशानं भरून येण्यासारखी नाही. तेव्हा तुमच्या कार्याला आम्ही दोघं मदत म्हणून ही रक्कम देत आहोत. तेव्हा हे पैसे तुम्ही घ्याचं।"

मुंबईहून आलेल्या कार्यकर्त्यांनी देवदासींना काही प्रश्न विचारले त्यावेळी देवदासींची त्या प्रश्नावरील प्रतिक्रिया आपल्या हळव्या मनालाही स्पर्श करून जातात. तेव्हा कार्यकर्ता म्हणते, "तुम्ही काय करता ?" देवदासी म्हणते, "माया काय करणार बाबा। म्हातारी झाली , आता माझ्याकडं कोण येतोया। मीया वापडी जोगवा मागून आलेलं दिस पुढं ढकलीत जगूलेया।"

फौजदार व गस्ती यांच्यात झालेला संवाद - "फौजदार साहेब तुम्ही मला गोळ्या घालणार होता, असं मी ऐकलं आहे तेव्हा घाला आता."
फौजदार म्हणतात, "तुमचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतो आहे. अहो, तसे मी काही म्हटलोच नाही." नावेचा ठेकदार म्हणतो, "कुठले लोक ? हे तुमचे चोरी करणारे लोक ?" गस्ती म्हणतात, "चोरी करणारे असलेतरी ते खरे बोलतात. आपलं इमान सोडीत नाहीत."

"कोण कोणकेल्याशी रे माझ्याविरूध्दतक्रार ? आम्ही कोणाकडूनही आठ आण्याच्या वर पैसे घेत नाही आणि तुम्ही खोटी तक्रार दिली ?" बेरड लोक म्हणतात, "सावकार, तीयाचं खोटं बोलूत्यास। आमच्याकडून दोन रूपयंSS घेत्याशी दोन रूपयं।" देवदासी व गस्ती यांच्यातील संवादही देवदासींच्या व्यथा स्पष्ट करतात.

बनव्वा, सत्यव्वा म्हणतात, "सैबा तुझ्याकडं धोंडया आला नाही ?"

"नाही। कुठे आहे तो ?"

"अग बाई, त्योतर येरवाळीच गेलाय सैबाना घेवून चंदगडास येतो म्हणून।"

"कुठ गेला भाडया धोंडया ?"

"तीन शंभर रूपये गोळा करूनशान त्यांच्याकड दिलावात दोन दिसामागं।"

यल्लवा देवदासीन बी·डी·ओ· यांना म्हणते, "पुढारी लोकावाणी बोलून दावू नगस· आमचं प्लॉट त्याने भरणार नाय· सरकार हे करून देतया, ते करून देतया म्हंत्याशी, पर कायबी करत नायशी· इथं बंगल्यामंधी आरामात बसोत कागदावर लित बसल्याशी तुमी सेबा लोग। आमी कसं जगतावात, ते कुठ तुमास ठाव हाय ? आता काय तर करून दावा·"

अशाप्रकारे आपणाला "आक्रोश" या आत्मचरित्रातील संवादावरून त्यातील बेरड समाजातील माणसे भेटल्याचा अनुभव येतो·

## 6· वातावरण निर्मिती

वातावरण निर्मितीमुळे "आक्रोश" या आत्मचरित्रातील प्रसंगांना वाव मिळतो· एवढेच नव्हेतर विशिष्ट प्रसंगाची खरे मर्म कळण्यास मदत होते· कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडल्यास वातावरण उपयुक्त ठरले आहे· म्हणून डॉ·भीमराव गस्ती यांनी आपल्या "आक्रोश" या आत्मचरित्रात योग्य ते वातावरण निर्माण केल्याने त्यांच्या या आत्मचरित्र ग्रंथास यश लाभले आहे· कथानकातील विविध प्रसंग, व्यक्ती आणि घटना यामध्ये कार्यकारण भावाची संगती या आत्मचरित्रात सहज प्रकट झाल्याने यातील व्यक्तिदर्शनाचे खरे मर्म आपणास कळते·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

डॉ·भीमराव गस्ती यांनी आपलया "आक्रोश" या आत्मचरित्रात स्थल, काल, व्यक्ती यांचे भान ठेवून कथानकाचा तपशील दिला आहे· वातावरण निर्मिती करणे ते भान न राहिल्यास बेरंग होण्यास वेळ लागत नाही· पण तसे गस्तींच्याकडून झाले नाही· गस्ती यांनी आपल्या आत्मचरित्रात वातावरणाची निर्मिती करून वाचकास कथानकात गुंतवून ठेवले आहे· हे एक त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्टयच म्हणावे लागेल· या वातावरण निर्मितीमुळे कथानकाचा प्रभाव वाचकांवर पडला आहे· एवढेच नव्हे तर गस्तींनी वाचकांच्या मनाव वातावरण निर्मितीचा दीर्घ काळ ठसाउमटून ठेवला आहे· आमदार लक्ष्मण माने यांची "उपरा", लक्ष्मण गायकवाड यांची "उचल्या", दया पवार यांचे "बलुत", आनंद यादव यांची "झोंबी" या आत्मचरित्रांचा आपणास उल्लेख करता येईल· गस्ती यांनी जसे व्यक्तिदर्शन, कथानक, प्रसंग, संघर्ष, संवाद इत्यादीचे वर्णन करतात त्याचप्रमाणे त्याची पार्श्वभूमी म्हणून वातावरण निर्मितीही केली आहे·

तात्पर्य या आत्मचरित्रात सर्वसमावेशक वाङ्मयाची निर्मिती केली आहे· ते त्यातील कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, संवाद, प्रसंग, भाषाशैली व वातावरण निर्मिती यामुळेच त्यांची "आक्रोश" हे आत्मचरित्र वाड्मयीन दृष्टया महत्वपूर्ण ठरली आहे· गस्ती यांनी "आक्रोश" या आत्मचरित्राची वातावरण निर्मितीसाठी पदयात्रा, जनजागृतीची पहाट यानी केली आहे· त्यामुळे संपूर्ण आत्मचरित्रात जिवंत वातावरण निर्माण झाले आहे·

बेरड लोक पोलीस ठाण्यातून स्वतःला सोडवून आणण्यासाठी पुढा-याला पैसे देतात पण हे पैसे चोरी करूनच मिळवितात· या ठिकाणी गस्ती यांनी बेरड लोकांनी केलेली चोरी आणि पकडले गेले असता पुढा-यांमार्फत कशाप्रकारे सोडवून आणले जाते यावरून आपणास तेथील असणारी वातावरणाची कल्पना येईल·

बेरड लोक चोरी करण्याच्या पध्दतीविषयी गस्ती म्हणतात, "पुणे बेंगलोर या महामार्गावर ज्या ठिकाणी घाट असेल त्या ठिकाणी वाहनांचा वेग कमी होतो तेव्हा बेरड मंडळी पाठीमागून ट्रकवर चपळाईने चढून दोर कापतात आणि त्यातील माल रस्त्याच्या कडेला टाकतात व लंपास करतात· या मालाच्या वाटणीमध्ये

पुढा-यांचाही हिस्सा असतो· यावरून आपल्याला घाटातील वाटमारीचे गांभीर्य लक्षात येते·

संपूर्ण डोंगराळ भागात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते· धनट्टी मानोळी, मास्तोळी, बुडयानूर, हुलीवर, कुमारी, होसूर व गुर्ती इत्यादी गावातील लोकांना चार मैल अंतरावरून एखाद्या नाल्यतून अगर विहिरीतून पाणी आणावे लागते· डोंगराळ भागातील वाटा या तशा अवघड असतात· पाणी आणताना काहींना प्राणास मुकावे लागले आहे· या वास्तव चित्रणामुळे बेरड लोकांना पाण्यासाठी किती वण-वण भटकावे लागते हे आपल्या लक्षात येते·

बेरड मंडळी जंगलातील कंदमुळे, गावरान मेवा, वन्य प्राण्याची शिकार यावर आपला उदरनिर्वाह करीत· पण कंत्राटदारांनी जंगलतील झाडे तोडल्यामुळे या जंगलात काटेरी झुडुपाशिवाय काहीही नाही· तेव्हा जगण्यासाठी या बेरडांना जंगलातील बारीक-सारीक काटक्या गोळा करून त्याची मोळी करून ते कळकांब, मुंचडी, सांबरा, कणबर्गी व हुदळी या डोंगरापासून सात आठ मैल लांब असणा-या गावात जाऊन विकतात· काही मंडळी जोडधंदा म्हणून हातभट्टीची दारू गाळून बाहेरच्या खेडयात आणून विकतात· या धंद्याच्यापोटी पोलिसांचा त्यांना खूप मार खावा लागतो· यावरून आपणास असे दिसून येईल की बेरड लोकांची दैन्य अवस्था व त्यांचे कष्ट व त्या कष्टाचा फायदा त्यांना कितपत होतो हे आपणास वातावरणामुळेच समजू शकते·

बेरड लोकांच्यावर एक प्रकारचा गुन्हेगारीचा शिक्काच मारला आहे· कारण बेळगाव हुक्केरी तालुक्यात जी पोलीस स्टेशनेपे होती तिथे असणा-या गुन्हेगारांच्या यादीमुळे बेरडांना मरणप्राय यातना भोगाव्या लागत होत्या· पूर्वी बेरडांना चोरी -दरोडे घातले होते· पण आता हे सगळे सोडून दिले होते· सुधारू पाहात होते पण गुन्हेगारी यादी त्यांच्या आड येत होती· यादीचा फायदा घेवून पोलीस मंडळी बेरडांना छळत होती· काही जण प्राणास मुकले आहेत· असे बेरडास भोगाव्या लागणा-या यातना कशाप्रकारच्या असतात हे आपणास कळते·

माईने स्वतःस जाळून घेतले· तिने स्वतःस का जाळून घेतले? या गोष्टीचा विचार करताना आपणास तिच्यावर झालेला अन्याय समजू शकतो·

गोद्या नाईकाची पोरगी भागी हिला मुसलमानाच्या कादरने पळवून नेले· पैशासाठी हपापलेली जात पंच मुसलमानाच्या बाजूला होवून गोद्या नाईकास त्रास देतात· यावरून आपणास बेरड समाजातील जात पंचायत कशा प्रकारची असते हे सिध्द होते·

बेरड समाजात अंधश्रध्देचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते· यल्ल्या हा बेळगावला हमालीचा धंदा करीत· परंतु त्याची मुलं जन्मल्या बरोबर मरत होती· यल्ल्याची बायको देवाधर्मात रमणारी· तिने कोणाच्या तरी सांगण्यावरून दोघे नवरा बायको दर अमावस्येला चिंचळीच्या मायाक्का देवीला जाऊ लागले· दोन वर्षानंतर त्यांना मुलगी झाली व ती मुलगी मायाक्का देवीला वाहिली· तेव्हा बेरड समाजात अंधश्रध्दा असल्याने अनेक तरूणी देवीस वाहिल्या जातात· व नंतर त्यांची होणारी दैनी अवस्था· हे सर्व अज्ञानापोटी घडत होते·

गस्तीनी पूर्वी भास्कररावांना चार हजार रूपये दिले होते· तेच पैसे त्यांना चौदा वर्षांनी मिळाले· त्या पैशाचा उपयोग गस्तींनी कशा प्रकारे केला याचेही चित्रण आले आहे·

चलनट्टी गाव चोरांचे म्हणून ओळखले जात होते· त्या गावाला कोणी जात नव्हते· याच गावात नाईक रामा मुदकाप्पा {बंबरग्या} हा सत्तर वर्षाचा, निधडया छातीचा, बेडर वृत्तीचा चोरी करण्यात पटाईत, कुविख्यात दरोडेखोर· त्याची उभी हयात चोरी करण्यात गेली पैशासाठी खून करण्यास मागेपुढे न पाहणारा· दहा बारा खून करून पचविले होते· यामुळे चलनट्टी गावच नव्हे तर आजूबाजूचा सगळा परिसर त्याच्या उमेदीच्या काळात थरथर कापत होता· बंबरग्याचे चित्रण केल्यामुळे तेथील परिसराची आपणास कल्पना येते·

गस्ती यांच्या घरात मालतीच्या लग्नाविषयी झालेले वादळ या बद्दल गस्ती यांनी घरातल्यांना मालतीविषयी काढलेले उद्गार हे खरोखरच व्यक्तिरेखा वातावरणामुळे

उठावदार ठरली आहे·

हिंदू-मुस्लिम तेढ यामुळे आशिक अल्ली यांच्यावर झालेला अन्याय· याच आशिक अल्लीचे बेरड लोकांना खूपच सहकार्य होते· पण हिंदू-मुस्लिम वादामुळे त्याच्यावर संकट कोसळले होते·

बेरड समाजाचा विकास करण्यासाठी गस्ती यांनी स्वतःला पूर्णपणे त्या कार्यात झोकून घेतले होते· घरच्या संसाराकडेही दुर्लक्ष केले होते· घरात तर त्यांच्या धान्याचा कण शिल्लक नव्हता· बायको आणि पोरं उपाशीच· तेव्हा दुकानदाराने उधारीने माल देण्याचे बंद केले होते· तेव्हा गस्ती यांनी घरात असणारी तीन हजार रूपयांची पुस्तके जुन्या पुस्तकाच्या दुकानात विकून आलेल्या पैशात घरात लागणारा सर्व माल भरला· या माणसाने सुखी संसाराचा किती मोठा त्याग केला होता हे आपल्या लक्षात येते·

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या "बेरड" या आत्मचरित्राला महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार जाहीर झाला· यामुळे सामाजिक कार्यकर्ते त्यांचा व्देष करीत होते· त्यावेळी या आनंदाच्या वातावरणात त्यांना सहन करावा लागलेला अन्याय आणि यामुळे त्यांची झालेली मानसिक अवस्था यांचे वर्णन हृदयस्पर्शी आहे·

देवदासींच्या समस्या व त्यांचे जीवन, भोगाव्या लागणा-या व्यथा समजून घेवून त्यांच्या समस्या गस्तीनी शासनाच्या दरबारी मांडल्या· त्यामुळे देवदासी स्त्रिया स्वावलंबी बनल्या·

अशा प्रकारे गस्ती यांनी वातावरणाची निर्मिती करून त्यांच्या उज्ज्वल व अस्सल प्रतिभेची बाब आपल्या लक्षात येते· दिसणारे सारेच तपशील टिपलेले आहे· या ठिकाणी त्यांच्या आत्मचरित्रात निवडीला फारसा वाव मिळाला नाही· यामुळेच त्यांचे "आक्रोश" हे आत्मचरित्र वाड्मयीन दृष्टया महत्त्वपूर्ण ठरली आहे·

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

7· **भाषा शैली :-**

डॉ·भीमराव गस्ती यांच्या "आक्रोश" या आत्मचरित्र ग्रंथाची भाषा पात्रानुरूप व प्रसंगानुरूप आहे· त्यांच्या भाषेत कोठेही आपणास गुंतागुंत आढळणार नाही· भाषेच्या स्वरूपांची आणि सामर्थ्याची जाणीव गस्तींना आहे· आत्मचरित्राशी एकरूप झालेली गस्तींची भाषा अगदी साधी आहे· तिच्यात कृत्रिमता बिलकून नाही· गस्तींची एकंदर भाषाच संवेदनाप्रधान आहे· त्यांना वर्णन करीत बसावे लागत नाही· यांची भाषा शैली साधीच आहे· त्यांच्या भाषा शैलीत घरगुतीप्रवाहाचे स्वरूप ही आपणास दिसून येते· त्यामुळे त्यांची भाषा शैली व्यक्ति रेखाना जीवंत करण्यास उपयोगी पडले आहे· ठिकाणाचे, व्यक्तिच्या प्रसंगाचे, भावनांचे किंवा विचारांचे बारकावे टिपणारी गस्तींची भाषा शैली सदैव व्यक्तिमत्व व मन साकार करण्याच्या प्रयत्नात असते· कोणताही प्रसंग डोळ्यासमोर उभा करण्याचा प्रयत्न करते· उदा· ठेकेदार बेरडांना त्रास देण्यासाठी वेगवेगळे तंत्र अवलंबीत होता आणि त्यांना पोलिसांच्या जाळ्यात अडकवू पाहत होता· कारण बेरडांच्या शेताता दड्डीच्या एका इसमाचे प्रेत ठेकेदाराने टाकले होते· तेव्हा बेरड मंडळी गस्तींना म्हणतात,

"आता कसं करत लंगा| यातनं तीयाच वाचवूस पाजे"

"घाबरायच कारण नाही तुम्हाला काही होणार नाही· पर मी सांगतो तसं करायला पाहिजे· तरच तुम्ही सुटणार|"

"काय सांगा की| आमी तसचं करतू·"

"हे बघा, आज रात्रीच ते मढं कसतरी करून त्या साहुकाराच्या मळ्यात टाकून या पर हे कोणस कळतलं ना नाय| मग पुढच काय करायचे, ते मी बघतो·"

यामुळे काही वेळा आत्मचरित्रातील पात्रे अन्याया विरूध्द संघर्ष करायला तयार होतात· गस्ती यांनी आपल्या आत्मचरित्र या ग्रंथात बारीक सारीक हालचाली व संवादातील खुणा त्यांची लेखणी तपशीलाने टिपत असते· गस्तीनी आपल्या अनुभवाचेच चित्रण या आत्मचरित्र ग्रंथात केले आहे· समोर दिसणारे सारेच्या सारे बारकावे ते टिपून घेण्याच्या प्रयत्नात त्यांच्या भाषा शैलीत गतीचा कमाल संथपणा व पाल्हाळ हे दोष निर्माण झालेले आपणास दिसत नाहीत· त्यांच्या भाषा शैलीमुळेच बेरड समाजाच्या

व्यक्तिंच्या वर्तनाचा व सारा मानसिक तपशील उपलब्ध होतो· उदा· पिढयान् पिढया चोरी दरोडेखोरीवरच उपजिविका करणारी ही जमात भयानक दारिद्रय अवस्थेत जीवन कंठीत होती· शिक्षणाचा गंध नव्हता· अज्ञान देवधर्माच्या अनिष्ट प्रथा, व्यसनाधिनता हीन दर्जाला पोहोचलेली· संसार संसारात चालणारे अनेक व्यभिचार व गुन्हेगारीचा शिक्का समाजाने मारलेला· हा समाज उष्टे खरकटे खावूनच कसाबसा जगत होता· पोटाची आग शमविण्यासाठी ताडी गाळणे, दारूच्या भट्टया लावणे, चो-या करणे खून करणे हे सर्व धंदे नित्याचे होवून बसले होते· व्यक्तिच्या संभाषणातील सारा जिवंतपणा, प्रत्येक व्यक्तिच्या ठळक ठळक लकबी, भाषा शैलीचे चढ उतार, आवाजातील खालसपणा, सावधपणा अगर छद्‌मीपणा या सा-या बाबी आपल्या डोळ्यासमोर उभ्या रहातात· "आक्रोश" आत्मचरित्र ग्रंथातील माईच्या जीवनाची व्यथा, देवदासींच्या व्यथा, कारखान्यास जमिनी दिल्यामुळे बेरड समाजाची झालेली दैनी अवस्था, त्यात पोलिसांचे अत्याचार, व गस्तींच्या कौटुंबिक संसारात मालतीच्या लग्नावरून निर्माण झालेला वाद इत्यादीचे वर्णन साध्या आणि सोप्या भाषेत केले आहे· त्यात राजकीय पुढाा-यांचा विरोध व समाज बांधवाकडून होणारा विरोध इत्यादी बाबींची प्रसंगानुरूप वर्णन, संवाद, चित्रे आली आहेत· तेव्हा डॉ·भीमराव गस्ती यांच्या "आक्रोश" या आत्मचरित्र ग्रंथातील भाषाशैली हे एक वैशिष्टयच मानावे लागेल·

अशा प्रकारे डॉ·भीमराव गस्ती यांच्या "बेरड व आक्रोश" या दोन्ही आत्मचरित्रांचे कथानक हे त्यांच्या स्वतःचे वास्तव जीवनच आहे· लोखंडाला परिसाचा स्पर्श होताच सोने होते· गस्तींच्या कठोर, दरिद्री, भयान, खडतर जीवनाला वास्तवाचा परिस स्पर्श झाल्यामुळे त्यांच्या वाङ्‌मयाचे सोने झाले आहे· वास्तवातील कुरूपता व निर्घृणता क्षुद्रता व स्वार्थ वृत्ती लक्षात घेतली की, आपल्याला त्याची अतिशय चीड येते· पण केवळ अन्यायाबद्‌दल चीड येणे एवढाच परिणाम दलित साहित्य कृतीने साधू नये· तर दलित साहित्य कृतीने भावनेला शास्त्रशुध्द ज्ञानाची वस्तूनिष्ठ विचारांची जोड देण्याचाही प्रयत्न व्हावा असे वाटते वास्तव जीवनाचा आशय जीवंत व उत्कट व्यक्तिचित्रणे, जीवनस्पर्शी वातावरण निर्मिती, पात्रानुरुप व प्रसंगानुरूप संवाद व स्वाभाविक भाषाशैली यामुळे "बेरडव आक्रोश" हे दोन्ही आत्मचरित्रपर ग्रंथ वाचकांच्या मनावर चिरंतन ठसा उमटवितात· व वाचकाला अंतर्मुख करतात हेच खरे या ग्रंथाचे वाड्‌मयीन सौदर्य होय·

## संदर्भ सूची


1· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
प्रस्तावना पान क्र· 9
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30

2· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
पान क्र· 2
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977·
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30·

3· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
पान क्र· 3
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30·

4· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
पान क्र· 3
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे - 30·

5· दलित साहित्य : वेदना व विद्रोह,
भालचंद्र फडके,
पान क्र· 32, 33
प्रथम आवृत्ती, डिसेंबर 1977
श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ,पुणे - 30·

6· दलित आत्मकथन,
संपादक - प्रा· चंद्रकुमाकर नलगे, डॉ·गंगाधर पानतावणे,
"निमित्त", पान क्र· 3, 4
प्रथम आवृत्ती, 26 जानेवारी 1986
कल्पना मुद्रणालय, पुणे·

7· दलित आत्मकथन,
संपादक - प्रा·चंद्रकुमार नलगे, डॉ·गंगाधर पानतावणे,
"निमित्त", पान क्र· 4
प्रथम आवृत्ती, 26 जानेवारी 1986,
कल्पना मुद्रणालय, पुणे·

8· "बेरड"
डॉ·भीमराव बशाणी गस्ती,
आत्मचरित्राच्या शेवटच्या मुखपृष्ठावर,
व्दितीय आवृत्ती, 1 ऑगस्ट 1992,
राजहंस प्रकाशन, 1025, सदाशिव पेठ,
नागनाथ पार, पुणे 30·

9· दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका,
संपादक प्रा· चंद्रकुमार नलगे,
पान क्र· 3
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर 1994
वर्ष 12, अंक दुसरा,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ पुरस्कृत

10· दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका,
संपादक प्रा· चंद्रकुमार नलगे,
पान क्र· 13,
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर 1994
वर्ष 4, अंक 2, 3
§महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत§

11· नव्या उर्मी नवी क्षितिजे, प्रा· गं·बा सरदार,
संपादक - प्रा· डॉ· ल· रा· नसिराबादकर,
पान क्र· 90,
प्रथम आवृत्ती, 15 जुलै 1987
संजय प्रकाशन, पुणे - 4·